cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com   नवी दिशा... नवे विचार.....   email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–४० | मंगळवार दि.२१ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### थापा मारा, पण मतदार सुज्ञ!

अडीच वर्षांपूर्वी राज्यात सत्तांतर झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठे बदल झाले. महाराष्ट्रातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राहुल गांधी, प्रियंका गांधी, मल्लिकार्जुन खरगे, उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी जोरदार प्रचार केला. महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या प्रचारात एकमेकांवर जोरदार आरोप केले. यात भाजपच्या प्रचाराचा भर प्रामुख्याने कॉँग्रेस आणि हिंदू–मुस्लिम वादाभोवतीच राहिला.

### बारावीच्या परीक्षेचा आज निकाल

मुंबई: महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाकडून फेब्रुवारी–मार्च २०२४ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवार, दि. २१ मे रोजी जाहीर होणार आहे. दुपारी एक वाजता मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळासह विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना हा निकाल पाहता येईल. मंडळाकडून निकालाच्या तारखेची घोषणा झाल्यानंतर आता सर्व विद्यार्थी आणि पालकांची धाकधूक वाढणार आहे. उद्याच्या निकालात काय होणार, याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली आहे. विद्यार्थ्यांना उद्या दुपारी एक वाजता ऑनलाईन पद्धतीने निकाल पाहता येईल. त्यानंतर महाविद्यालयांमध्ये त्यांना गुणपत्रिका वितरीत केल्या जातील.

# निवडणूक शेतकऱ्यांच्या मुळावर; दुष्काळ असूनही हाती भोपळा!

## संताप; शेतमालाला भाव नाही, अनुदान मिळेना, रोजगार नाही, विम्याचा थांगपत्ता नाही




**विशेष प्रतिनिधी । बीड**

**निवडणुक ही लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव आहे, तो वेळोवेळी घेतलीच पाहीजे. मात्र ज्याला जगाचा पोशिंदा म्हणायचे त्याचे काय हाल होत आहेत, याची कोणालाही जाणीव नाही. कारण नेते, अधिकारी आणि कार्यकर्ते सुध्दा सध्या लोकसभेच्या रणधुमाळीत गुंतले आहेत. मग इकडे बिचारा शेतकरी मेला तरी त्यांना त्याचे काहीच देणेघेणे नाही. राज्यात दुष्काळ असताना हाताला काम नाही, अनुदान नाही, शेतमालाला भाव नाही, विम्याचा थांगपत्ता नसताना नेते आणि अधिकारी मात्र निवडणुकीत व्यस्त आहेत. शासनाकडून दुष्काळातही हाती भोपळा लागला असल्याने खऱ्या अर्थाने ही निवडणुक शेतकऱ्यांच्या मुळावर आली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.**

### शेतकऱ्यांची मते चालतात पण ते नाही

कोणत्याही निवडणुकीत शेतकऱ्यांची नेत्यांना मते चालतात, पण शेतकरी चालत नाही, असेच सध्या देशात चित्र दिसत आहे. शेतकऱ्यासाठी ठोस असे काहीच सरकारकडून केले जात नाही, याची खंत शेतकऱ्यांच्या मनात कायम आहे.

### निवडणुकीतील उधळपट्टी थांबवा, शेतकऱ्यांना मदत करा

सध्या सर्वच राजकीय पक्षांकडून निवडणुकीत वेगवगेळ्या माध्यमातून कोट्यावधींची उधळपट्टी केली जाते. ही रक्कम ऐवढी मोठी असते की, देशातील शेतकऱ्यांचे सर्व कर्ज माफ होऊ शकेल, त्यासाठी तुमची उधळपट्टी थांबवा, आम्हाला मदत करा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

जगाचा पोशिंद्यालाच आता कोणी तरी पोसण्याची गरज आहे. शेती ही सध्या आतबट्याची झाली आहे. शेती करण्यापेक्षा एखाद्या नेत्याच्या मागे फिरण्यात ही तरुण पिढी धन्यता मानत आहे. असंख्य तरुण शेती सोडून शहरात स्थलांतरित झाले आहेत. यंदा राज्यात तीव्र दुष्काळ असल्याने राज्य शासनाने दुष्काळ जाहीरही केला पण शेतकऱ्याच्या हाती फक्त भोपळा लागला आहे. शासनाने अनुदान जाहीर केले खरे पण ते अजूनही शेतकऱ्यांना मिळाले नाही. एक रुपयात विमा भरला खरा पण दिवाळीत



२५ टक्के अग्रीम विमा मिळाला मात्र राहीलेला विमा अजूनही शेतकऱ्यांना मिळाला नाही. दुष्काळ असल्याने शेतकरी, शेतमजुर यांना गावातच त्यांच्या हाताला काम द्यायला हवे, पण आचारसंहितेच्या नावाखाली अधिकारी काहीच बोलू देत नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शेतमालाला तर कधी तरी भाव येईल याच आशेवर सध्या शेतकरी जगत आहे. निर्यातबंदी हे हत्यार केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या विरोधात ◀◀ पान २ वर

### शेतकऱ्यांचा विषय आला की दुर्लक्ष का?

कोणत्याही प्रकल्पावर हजारो कोटी रुपयांचा खर्च केला जातो, सरकारकडे पैसे नसले तर दुसरा पर्याय शोधून निधी उभा केला जातो. मग शेतकऱ्यांचा ज्या ज्या वेळी विषय निघतो, त्या त्या वेळी राज्य व केंद्र सरकारमधील लोकप्रतिनिधी, मंत्री हे तोंड वाकडं करून दुर्लक्ष करतात. कधी तरी त्यांनी शेतकऱ्यांचा विचार करायला हवा, अशी अपेक्षा सामान्य नागरीकातून व्यक्त केली जात आहे.

### शेतकऱ्यांचा रोष : गळ्यात टोमॅटो-कांद्याच्या माळा घालून केले मतदान!



**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यात सोमवारी लोकसभेसाठी पाचव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान पार पडले. यामध्ये कांदा पिकाचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांनी आपला सरकारप्रती असलेला रोष व्यक्त केला. काही शेतकऱ्यांनी चक्क आपल्या गळ्यात कांदे आणि टोमॅटोच्या माळा घालून मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे या घटनेने कांदा प्रश्नासंबंधीचा प्रश्न किती गंभीर आहे, आणि सरकारी धोरणाला शेतकऱ्यांचा किती विरोध आहे, याची प्रचिती आली.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील वडगाव पंगू या ठिकाणी युवा शेतकरी केंद्र सरकारच्या कांदा निर्यातीच्या धोरणावर रोष व्यक्त करताना दिसून आले. ते आपल्या गळ्यात कांद्याच्या माळा घालून मतदान केंद्रावर आले. पण त्यांना पोलिसांनी मतदान केंद्रावर अडवले आणि कांद्याच्या माळा काढून मतदान करण्यास सांगितले. या प्रकारामुळे वडगाव इथे मोठा जनसमुदाय गोळा झाला होता पण पोलिसांनी वातावरण नियंत्रणात आणले. या संपूर्ण प्रकारावर जिल्ह्यातील नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. भुजबळ यांनी म्हटले आहे की, ‘‘मतदान केंद्रात कांद्याच्या माळा नेल्याने मतदान अधिकारी त्यावर काही करू शकत नाहीत. त्यामुळे मतदान करा, कांद्याच्या माळा घालून गेलो म्हणून मतदान करू शकलो ◀◀ पान २ वर

# बीडसह बारामतीत बोगस मतदान

## » शरद पवारांचा सर्वात मोठा आरोप, कारवाईची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

**राज्यात लोकसभा निवडणुकीचे चार टप्प्यातील मतदान पार पडले आहे. आज पाचव्या टप्प्यांचे मतदान पार पडत आहे. या वेळी पैसे वाटल्याचे आणि मतदारांवर दबाव आणण्यात आल्याच्या अनेक घटना समोर आल्या होत्या. बीड आणि बारामतीतील मतदानात पैशांचा गैरवापर आणि काही व्यक्तीकडून नागरिकांवर दबाव झाल्याचा आरोप रोहित पवारांनी केला होता. यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. आता राष्ट्रवादी कॉँग्रेसचे संस्थापक शरद पवारांनी बीड आणि बारामतीत बोगस मतदान झाल्याचा आरोप केला आहे. तसेच या संदर्भात निवडणूक आयोगाकडे कडक कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी या वेळी केली आहे. एका वृत्तवाहिनीच्या विशेष मुलाखतीत ते बोलत होते.**

शरद पवार म्हणाले, बीड, पुणे, बारामती लोकसभा मतदारसंघ सोडले तर बाकी ठिकाणी मतदान शांततेत पार पडले. महाराष्ट्रात कधीच पैशाचा वापर झाला नव्हता. यावर्षी मोठया प्रमाणात पैशांचा वापर झाला. बारामती लोकसभा मतदारसंघात रात्री दोन वाजता एक बँक उघडी होती. आणि तिथून पैसे वाटप होत होते. हा प्रकार घडला आहे. असे कधी झाले नाही पण यावर्षी काही ठिकाणी अशा गोष्टी पाहिल्या मिळाल्या. बीड आणि बारामती मध्ये बोगस मतदान झाले आहे. बीडमध्ये बूथ कॅप्चर करण्याचा प्रकार झाला. बोगस मतदान करणे, लोकांना मतदान करू न देणे हे देखील प्रकार घडले. पुणे जिल्ह्यात देखील असे प्रकार पाहायला मिळेल. यामागे जो आहे त्याच्यावर सक्त कारवाई केली पाहिजे हा माझा आग्रह आहे, असे पवार म्हणाले. निवडणूक आयोगाच्या सध्या भूमिकेवर देखील शरद पवारांनी वक्तव्य केले आहे . शरद पवार म्हणाले, ◀◀ पान २ वर

## पवारांच्या आरोपानंतर बजरंग सोनवणे थेट स्टाँग रूमवरच धडकले

**परळीला आम्ही नाही तर तुम्ही आधीच बदनाम केले–सोनवणे**



**बीड । प्रतिनिधी**

बारामती आणि बीडमध्ये बोगस मतदान केल्याचा आरोप शरद पवारांनी केल्यानंतर त्यांच्या गटाचे बीडचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी ईव्हीएम मशिन ज्या ठिकाणी ठेवण्यात आले आहेत त्या स्ट्राँग रुमला भेट दिली. परळीला आम्ही बदनाम करायची गरजच नाही, तुम्ही आधीच बदनाम केलंय असा टोला त्यांनी धनंजय मुंडे यांचे नाव न घेता लगावला.

बीड लोकसभेच्या निवडणुकीमध्ये बोगस मतदान झाल्याच्या तक्रारी यापूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी ◀◀ पान २ वर

### “ बजरंग सोनवणेंची १९ ठिकाणी फेरमतदानाची मागणी

दरम्यान, महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी बीडमधील परळीत बुथ कॅप्चर करण्यात आल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली आहे. अनेक पोलिंग एजंन्टसला गायब करण्यात आले, मतदारांना मारहाण झाल्याचा आरोप करत त्यांनी १९ गावात फेरमतदान घेण्याचीही मागणी केली.

### परळीच्याच नागरीकाचा बोगस मतदान झाल्याचा दावा

**» परळी तालुक्यातील इंजेगाव येथे बजरंग सोनवणे यांचे मुक्ताराम गवळी हे पोलिंग एजंट होते. बोगस मतदानाला विरोध केल्याने आपल्याला भाजप व राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली असल्याचे सांगून पालकमंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यापासून आपल्या जिवीताला धोका असल्याचे प्रसार माध्यमांशी बोलताना गवळी यांनी सांगितले. तसेच त्यांनी पोलिस अधिक्षक यांच्याकडेही तक्रार दिली आहे.**

### १७ मजुरांचा जागीच मृत्यू

छत्तीसगड–पिकअपचे नियंत्रण सुटल्याने भीषण अपघाताची घटना घडली. ही पिकअप थेट २० फूट खोल दरीत जावून कोसळली. या पिकअपमध्ये ◀◀ पान २ वर

### पाचव्या टप्प्यात महाराष्ट्रात ४८ तर देशात ५६ टक्के मतदान

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील ४८ पैकी १३ मतदारसंघात सोमवार दि. २० मे रोजी मतदान झाले. राज्यातील लोकसभा निवडणुकीचा पाचवा आणि अंतिम टप्पा आला संपला आहे.**

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील १३ मतदारसंघात सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ४८.६६ टक्के मतदान राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील एकूण धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याम, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर ◀◀ पान २ वर

**मतदानाची टक्केवारी**

धुळे– ४८.८१ टक्के
दिंडोरी–५७.०६ टक्के
नाशिक–५१.१६ टक्के
पालघर– ५४.३२ टक्के
भिवंडी– ४८.८९ टक्के
कल्याण–४१.७० टक्के
ठाणे– ४५.३८ टक्के
मुंबई उत्तर–४६.९१ टक्के
मुंबई उत्तर मध्य–४७.३२ टक्के
मुंबई उत्तर पूर्व–४८.६७ टक्के
मुंबई उत्तर पश्चिम–४९.७९ टक्के
मुंबई दक्षिण–४४.२२ टक्के
मुंबई दक्षिण मध्य–४८.२६ टक्के.

### गडाच्या परिसरात वृक्षारोपणासाठी एक कोटीचा निधी उपलब्ध करणार–आ.धस

**शिरूर । प्रतिनिधी**

**उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत चालला असून ४२ डिग्री जिल्ह्यात तापमानाने पार केली. भविष्यात हे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे. हे संकट लक्षात घेता वृक्षरोपण हा एकमेव पर्याय उरला आहे. येथील भाविकांच्या सुख सोयीसाठी आणि आरोग्यासाठी श्रृंगऋषीगडाच्या डोंगरावर वृक्ष लागवड आवश्यक आहे. गडावरती वृक्षरोपणाचे सुशोभिकरण करून गडाचे वैभव वाढण्याबरोबरच पर्यवरणाला हात भार लावावा. आगामी अधिवेशनामध्ये श्रृंगऋषीं गडावर वृक्षलागवडीसाठी पर्यटन विभागाकडून एक कोटी पर्यंतचा निधी करून देणार असल्याचे अभिवचन आ. सुरेश धस यांनी दिले आहे.**



शिरूर कासार तालुक्यातील श्रृंगऋषीगडावर वै.महंत तुकाराम महाराज रुपनर यांच्या पाचव्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त महंत सुरेशानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखागेल्या आठ दिवसापासून अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या

### ईव्हिएमची पुजा करणे शांतीगिरी महाराजांना भोवली

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा मतदार संघात शांतिगिरी महाराज हे अपक्ष म्हणून लोकसभेच्या रिंगणात उतरले. अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. शांतीगिरी महाराज यांनी त्र्यंबकेश्वरच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मतदान केंद्रवर मतदान केले. मात्र यावेळी त्यांनी आपल्या गळ्यातील हार ईव्हीएम कक्षाला घातला. यापूर्वी शांतीगिरी महाराज यांनी मतदान केंद्राबाहेर पूजा करून वंदन केले होते. यावरून हा आदर्श आचारसंहितेचा उल्लंघन असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. त्यानंतर आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी आता शांतीगिरी महाराजांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घडलेल्या या प्रकारामुळे शांतीगिरी महाराजांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२० मे २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ५.५० क्विंटल | २,२०० | २,६५६ | २,४२८ |
| ज्वारी/हायब्रिड : १७२.५० क्विंटल | १,९५६ | ३,५५० | २,६३१ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : २८.०० क्विंटल | १०,००१ | १२,१०० | ११,५५८ |
| उडीद : ५.५० क्विंटल | ७,९०० | ७,९०१ | ७,९०० |
| बाजरी: ४२.५० क्विंटल | २,२०० | २,८०० | २,५२८ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ४८.५० क्विंटल | ४,२०० | ४,५५० | ४,४५० |
| हरभरा: १४.५० क्विंटल | ४,५०० | ६,००० | ५,७३१ |

# आपला अमेरिका, कॅनडा, अरब देशातून अवैध फंडिंग

## » केंद्रीय गृहमंत्रालयाला पाठविलेल्या अहवालात ईडीकडून खुलासा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**दिल्लीच्या दारू घोटाळ्यात अडकलेल्या आम आदमी पक्षाच्या अडचणी कमी होण्याची चिन्हे नाहीत. कोर्टात सुरू असलेल्या या प्रकरणी आता ईडीने आम आदमी पार्टीला परदेशातून फंडिग होत असल्याचा खुलासा केला आहे. आपला २०१४ ते २०२२ या काळात ७.०८ कोटी परदेशी निधी मिळाला. मात्र हा फंड देणाऱ्या परदेशी देणगीदारांची नावे आणि अन्य माहिती लपवण्याचा आरोप ईडीने केला आहे. ईडीने याबाबत केंद्रीय गृहमंत्रालयाला रिपोर्ट पाठवला आहे.**

ईडीने म्हटले की, आम आदमी पार्टीला संयुक्त राज्य अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड, सौदी अरब, संयुक्त अरब अमीरात, कुवैत, ओमान आणि अन्य देशातून देणगी मिळाली आहे. फंड ट्रान्सफर करण्यासाठी विविध देणगीदारांकडून एकच पासपोर्ट, क्रेडिट कार्ड, ईमेल आयडी आणि मोबाईल नंबरचा वापर करण्यात आला आहे. ईडीने आप आणि त्यांच्या नेत्यांना मिळालेल्या परदेशी फंडातील अनियमिततेवर बोट ठेवले आहे. यात पक्षाचे आमदार दुर्गेश पाठक यांच्यासह अनेक नेत्यांवर २०१६ मध्ये कॅनडातून फंड रेजिंग प्रोग्रामसाठी जमवलेले पैसे व्यक्तिगत लाभासाठी दुरुपयोग केल्याचा आरोप आहे. इतकेच नाही तर अनिकेत सक्सेना (आप ओवरसीज इंडिया कॉर्डिनेटर), कुमार विश्वास (तत्कालीन आप ओवरसीज इंडियाचे संयोजक), कपिल भारद्वाज आणि पाठक यांच्यासह विविध स्वयंसेवक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये पाठविण्यात आलेल्या ईमेलचा उल्लेख ◀◀ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# थापा मारा, पण मतदार सुज्ञ!

अडीच वर्षांपूर्वी राज्यात सत्तांतर झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठे बदल झाले. महाराष्ट्रातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, नितीन गडकरी, मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राहुल गांधी, प्रियंका गांधी, मल्लिकार्जुन खरगे, उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी जोरदार प्रचार केला. महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या प्रचारात एकमेकांवर जोरदार आरोप केले. यात भाजपच्या प्रचाराचा भर प्रामुख्याने काँग्रेस आणि हिंदू-मुस्लिम वादाभोवतीच राहिला. यावेळी दोन्ही बाजूंनी एकमेकांवर खालच्या पातळीवर व्यक्तिगत टीकेची झोड उठवल्याने प्रचाराचा स्तर घसरल्याचे दिसून आले.

देशात पाचव्या टप्प्यात ८ राज्य व केंद्रशासित प्रदेशांतील ४९ जागांवर सोमवारी मतदान पार पडले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, राहुल गांधी, माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, चिराग पासवान आदी दिग्गजांचे राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले. पाचव्या टप्प्यात राज्यात आघाडीतर्फे उद्धव ठाकरे यांनी प्रचाराची धुरा सांभाळली. महायुतीकडून पंतप्रधान मोदी यांच्या प्रचार सभांचा धडाका लावण्यात आला होता. मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले होते. पाचव्या टप्प्यातील प्रचार संपताना शरद पवार यांनी पंतप्रधान मोदींबाबत एक मोठे विधान केले. लोकसभा निवडणूक सुरू होण्यापूर्वी देशात मोदींच्या बाजूने वातावरण होते. सर्वत्र त्यांचीच चर्चा होती. मात्र नंतर अशा काही गोष्टी घडल्या की त्यामुळे वातावरण फिरले आणि महाविकास आघाडीला लोकांचे पाठबळ मिळत गेले. प्रारंभी 'अब की बार चारसौ पार' अशा बाता मारणारे आता खासगीत २५०-२६० जागा मिळतील असे म्हणू लागले आहेत. मोदींनी बेफाम आणि बेताल वक्तव्ये करून स्वत:च्याच पायावर धोंडा मारून घेतला असे म्हणता येईल. टीव्हीवरच्या जाहिरातींपासून ते रस्त्यावरच्या फ्लेक्सपर्यंत, टी शर्टपासून ते चौकाचौकात फिरणाऱ्या डिजिटल स्क्रीनवर भाजपच्या चारशे पार जाहिरातींचा बोलबाला दिसत होता. मोदींचा फोटो लावून भाजपने ही टॅगलाईन अशी काही लोकांपर्यंत पोहोचवली की लोकसभेला फक्त आणि फक्त मोदींचाच करिष्मा चालेल असे वाटत होते. पण लोकसभा निवडणुकीचे मतदान पाचव्या टप्प्यावर येऊन पोहोचले आणि भाजपच्या 'चारशे पार' घोषणेचा फज्जा उडाल्याची चर्चा वाढत गेली. गत दहा वर्षांत भाजपच्या अनेक घोषणा गाजल्या. 'अच्छे दिन आएंगे', 'अब की बार मोदी सरकार', 'फिर एक बार मोदी सरकार', 'मोदी है तो मुमकीन है' आदी घोषणांतून भाजप म्हणजे मोदी आणि मोदी म्हणजे भाजप असे चित्र निर्माण केले गेले. या घोषणांच्या गदारोळात विरोधकांच्या कोणत्या घोषणा होत्या ते आठवत नाही. आता 'मोदी की गॅरंटी'चा वादा करण्यात आला आहे.

भाजपच्या घोषणांचा फज्जा उडण्यास कारणीभूत ठरले ते कर्नाटकचे खासदार अनंत कुमार हेगडे यांचे वक्तव्य. हेगडे म्हणाले, भाजपला चारशेहून अधिक जागा हव्या आहेत, कारण दोन तृतीयांश बहुमत असेल तर संविधानात सुधारणा करता येणार. विरोधकांना आयते कोलित मिळाले. विरोधकांनी ही देशातली शेवटची निवडणूक असून, मोदी यापुढे हुकूमशहा बनतील असा प्रचार सुरू केला आणि भाजपच्या प्रचारतंत्राचे तीन तेरा वाजले. मुस्लिम समाजासंबंधीची मोदींची वक्तव्ये भाजपला भोवणार अशी परिस्थिती निर्माण झाली. शिवाजी पार्कवर महायुतीची तर बीकेसीच्या मैदानावर महाविकास आघाडीची जंगी सभा झाली. दोन्ही सभांना चांगला प्रतिसाद मिळाला. आता मतदान कुणाच्या बाजूने झाले ते ४ जून रोजीच कळू शकेल. पंतप्रधान मोदींनी तिहेरी तलाक, राम मंदिराचा प्रश्न सोडवला असा दावा केला जात आहे. परंतु यामागे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची पार्श्वभूमी आहे हे विसरून चालणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला नसता तर अजूनही राममंदिर अस्तित्वात आले नसते. भाजपला पराभव दिसू लागला आहे असे बोलले जात आहे. जनतेने आता निवडणूक हातात घेतली आहे असे महत्त्वाचे विधान काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनी केले आहे. अर्थात याचा फैसला जनतेच्या दरबारातच होईल. देशातील मतदार सुज्ञ आहेत हे अनेकवेळा सिद्ध झाले आहे. सत्ताधारी, विरोधक काहीही बोलत असले, थापा मारत असले तरी मतदार राजा सारे शांतपणे ऐकत असतो. आपल्या हिताचे निर्णय घेण्यास मतदार सक्षम आहेत, विखारी प्रचार करणाऱ्यांना ते त्यांची जागा दाखवून देतील यात शंका नाही. लोकप्रियतेच्या जोरावर आपणच सत्तेवर राहू अशा भ्रमात असाल तर तो मोडून काढण्यास मतदार सिद्ध आहे.

## पान १वरून...

### निवडणूक शेतकऱ्यांच्या

यावर्षी मोठ्या प्रमाणात उपसले आहे. निर्यातबंदीचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. सध्या कापूस, सोयाबीन, मका, उडीद, कांदा, अद्रक या पिकांना चांगला भाव नाही. दुष्काळ असल्याने तरी शेतमालांना भाव मिळेल असे शेतकऱ्यांना वाटत होते. मात्र तसे झाले नाही. पुढाऱ्यांकडे सध्या तरी निवडणुकांमुळे शेतकऱ्यांसाठी वेळ नाही. पुढे आणखी ६ महिन्याने विधानसभा निवडणुका आहेतच, त्यामुळे मंत्री व नेते पुन्हा त्यात व्यस्त होणार आहेत. ज्यावेळी वेळ मिळेल, त्यावेळी वेळ निघून गेलेली असेल, असे म्हटले जात आहे.

---------

### शेतकऱ्यांचा रोष : गळ्यात टोमॅटो-

नाही असे करू नका'' कांद्याच्या माळा आम्हाला दाखवा, जे कोणी राजकारणी आहेत त्यांना दाखवा. राजकारण्यांपुढे सत्याग्रह करा, असे आवाहनही यावेळी भुजबळ यांनी संबंधित शेतकऱ्यांना केले. दरम्यान, गेल्या वर्षभरापासून नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये सरकारविरोधात रोष असल्याने, सत्ताधारी पक्षाला या ठिकाणी आपली जागा राखणे. थोडे अवघडच जाणार असल्याचे जाणकारांकडून सांगितले जात आहे.

**'ज्यांनी केली निर्यात बंदी, त्याला नाही सत्तेची संधी''**

गळ्यात टोमॅटो आणि कांद्याच्या माळा घालून आलेल्या शेतकऱ्यांमध्ये तरूण शेतकऱ्यांचा जास्त समावेश होता. यावेळी या शेतकऱ्यांनी ''ज्यांनी केली निर्यात बंदी, त्याला नाही सत्तेची संधी,'' अशा घोषणा दिल्या. यामुळे काही काळासाठी याठिकाणी गोंधळाचे वातावरण झाले होते. मात्र पोलिसांनी यात वेळीच हस्तक्षेप करून हा गोंधळ थांबविला. दरम्यान, आलेल्या सगळ्या शेतकऱ्यांनी मतदानाच हक्क बजावला.

-------------

### बीडसह बारामतीत

निवडणूक आयोग सध्या असे काही निर्णय घेत आहेत की त्यामुळे अडचण होत आहे. आमचा पक्ष काढून घेतला आमचे चिन्ह काढून घेतला आणि त्यामुळे आम्हाला कोर्टात जावे लागले. मात्र आम्ही यंदाच्या निवडणुकीत आम्ही सामंजस्याची भूमिका घेत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. आम्ही स्वतः ४८ पैकी दहा जागा लढवत आहोत आमच्या या भूमिकेमुळे आम्हाला फायदा होताना पाहायला मिळत आहे, असे ते म्हणाले.

-----------------

### पवारांच्या आरोपानंतर बजरंग

केलेली आहे. मात्र मागच्या दोन-तीन दिवसांमध्ये काही व्हिडीओज समोर आल्यानंतर सोमवारी बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष महबूब शेख यांच्यासह बीड शहराच्या बाजूला असलेल्या पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये बनवलेल्या स्ट्राँग रूमला भेट दिली. स्ट्राँग रूमची पाहणी करण्यासाठी ही भेट दिली असल्याचं सांगत बजरंग सोनवणे यांनी बीडच्या जिल्हा पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासनावर आरोप केले. या निवडणुकीत प्रशासनाने एकतर्फी काम केल्याचा पुन्हा एकदा आरोप त्यांनी केला. परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याच्या तक्रारी करण्यासाठी आम्ही एसपी आणि कलेक्टर यांच्याकडे दिल्या. मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप यावेळी बजरंग सोनवणे यांनी केला.

---------

### पाचव्या टप्प्यात महाराष्ट्रात

पश्चिम, मुंबई उत्तर पूर्व, मुंबई उत्तर मध्य, मुंबई दक्षिण मध्य, मुंबई दक्षिण या १३ मतदारसंघात एकूण १३ मतदारसंघात सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे सरासरी ४८.६६ टक्के मतदान झाले आहे.

--------------

### आपला अमेरिका, कॅनडा,

करण्यात आला आहे. आतापर्यंतच्या तपासणीत संयुक्त राज्य अमेरिका, कॅनडामध्ये फंड रिंजग कॅम्पेनमधून केवळ पैसा गोळा केला नाही तर परदेशी फंडासाठी एफसीआरआय अंतर्गत लावण्यात आलेल्या निर्बंधापासून वाचण्यासाठी देणगीदारांची माहिती लपवली जात आहे असा आरोप ईडीने केला आहे.

-----------

### १७ मजुरांचा

तब्बल ४० पेक्षा जास्त मजूर होते. अपघात इतका भीषण आहे की, तब्बल १७ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर २० पेक्षा जास्त जण जखमी असल्याची माहिती मिळत आहे. या अपघातामुळे मृतांच्या नातेवाईकांनी टाहो फोडला. अपघातानंतर घटनास्थळी प्रचंड किंकाळ्या, आरडाओरड ऐकू आल्या आणि हाहा:कार माजला. हा अपघात छत्तीसगडच्या कवर्धा जिल्ह्यात घडला.

-------------

### गडाच्या परिसरात वृक्षारोपणासाठी एक

थाटात पार पडत होता. या सप्ताहाची सांगता सोमवार दि. २० मे रोजी महंत सुरेशानंद महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने झाली आहे. या सांगतेच्या कार्यक्रमासाठी आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे भाजपा नेते आ.सुरेश धस यांची उपस्थिती लाभली होती. सप्ताह समितीच्या वतीने त्यांचा सत्कारही करण्यात आला यावेळी आ. सुरेश धस बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले गडावरती मी त्यापूर्वी आलो होतो. त्यावेळी राष्ट्रपती महादेवजी जानकर यांच्याशी खूप वेळ चर्चा झाली होती. गडाचा विकास होणे ही गरजेचे आहे असेही या चर्चेतून पुढे आले होते. गडाचा भौतिक विकासाबरोबरच पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी आणि गडावर येणाऱ्या भाविक भक्तांच्या व परिसरातील जनतेच्या सुख सोयीसाठी व आरोग्यासाठी गडाच्या डोंगरावरती वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. कमी अधिवेशनात पाठपुरावा करून पर्यटन विभागाच्या मार्फत या गडाला एक कोटी पर्यंत चा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. ही पुढाकार घेणे गरजेचे आहे आणि गडावरती प्रामाणिकपणे वृक्षारोपण करणे गरजेचे आहे. शिरूर तालुक्यामध्ये पाणीटंचाईची मोठी संकट आहे. या पाणीटंचाईच्या संकटावर मात करणे हे आपले आता कर्तव्य आहे. पाणीटंचाईवर मात करून करू त्यासाठी लागेल ती मदत आपण महाराजांना करणार असल्याचे आ. सुरेश धस यांनी सांगितले त्याचबरोबर गडावर पार पडणाऱ्या विविध कार्यक्रमासाठी या ठिकाणी सभागृही महाराज सांगतील त्याप्रमाणे उभारण्यात येईल त्यासाठी लागणारा निधी आपण उपलब्ध कर देऊ असे अभिवचन यावेळी आ.सुरेश धस यांनी दिले आहे. यावेळी महंत सुरेशानंद महाराज यांच्यासह, माजी आ. नारायण मुंडे, रासपा जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मातकर,भगवान माने, शिरूर नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष प्रकाश देसरडा, बीड विधानसभा मतदारसंघ रासप अध्यक्ष माऊली मार्कड, तिंतरवणीचे सरपंच उद्धव (बापू )खेडकर, उमेश खेडकर ,माजी उपसरपंच मच्छिंद्र शिंगाडे, आदींसह पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# 'डे झिरो च्या उंबरठ्यावरचा पावसाळा'!

'नेमेची येतो पावसाळा या म्हणीप्रमाणे तो आला पण एक इशारा त्यासोबत आहे. तो जाणला तर आपण या पावसाळ्यापाठोपाठ दुष्काळाचं दुष्टचक्र थांबवू शकणार नाही बंगळूरुनं दिलाय इशारा त्याकडे लक्ष देत गांभिर्यानं पावसाचं स्वागत करताना पाणी जपलं नाही तर 'डे झिरो' येऊ घातला. पाणी-बाणी बाबत खास लेख

**प्रशांत दैठणकर**
**जिल्हा माहिती अधिकारी, बीड**

***आपल्या मराठी भाषेत खास काही गुण आहेत आणि भाषेची काही वैशिष्ट्ये देखील आहेत, अलंकार, वृत्त आणि इतर विविध प्रकारांनी समृद्ध अशा या आपल्या मराठी भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणून भाषक म्हणींचा उल्लेख करता येईल. तसे म्हणींचा हा प्रकार सर्वच भाषांमध्ये असला तरी मराठीत याचे महत्त्व वेगळे आहे.***

अतिशय चपखलपणे मोजक्या शब्दात मार्मिक पद्धतीने बौद्धिक ज्ञान देणाऱ्या म्हणा की चोप देणाऱ्या म्हणी मराठीत आढळतात अर्थात हा भाषिक प्रवास करण्याचा भाग वेगळ्याच कारणाने आहे.

आपल्याकडे आनंदवार्ता आली.. मान्सून अर्थात नैऋत्य मौसमी पाऊस नियमित आराखडा बाजूला ठेवत ३ दिवस आधी अंदमानात दाखल झालाय मात्र आपल्याकडे आशा पल्लवीत होत असताना देखील तहान भागत नाही कारण अर्थातच पाणी.

पाणी-बाणी, पाण्याचे संकट, पाण्याचे दुर्भिक्ष्य पासून दुष्काळापर्यंत शब्द माध्यमातून उमटतात आणि पाण्याचं संकट अधिक गहिरं होतं आहे असं जाणवायला लागतं.

आपल्या खंडप्राय भारत देशात एकाचवेळी काही ठिकाणी दुष्काळ तर काही ठिकाणी अतिवृष्टी असं विषम चित्र आहे आणि याचं कारण देखील तसंच आहे. कारण आपला देश हा मौसमी हवामान क्षेत्रात आहे. आसेतू हिमाचल अशा विस्तीर्ण देशात ही स्थिती अपरिहार्य आहे असेच म्हणता येईल. मात्र वारंवार



काही भागात निर्माण होणारी पाण्याची टंचाई आणि त्याच्याशी निगडित बाबी आपल्या नियोजनाशी जोडलेल्या आहेत.

गेल्या काही वर्षात झपाट्याने झालेले नागरिकीकरण आणि शहरांचा विस्तार व सोबतच झपाट्याने वाढणारी लोकसंख्या यांचा या पाणी प्रश्नाशी जवळचा संबंध आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे पाणी प्रश्न गंभीर होत आहे आणि त्यातही पिण्याचे पाणी अर्थात पेयजलाची समस्या अत्यंत गंभीर आहे आणि याची पहिली धोक्याची घंटा ८ वर्षांपूर्वीच आपण दक्षिण आफ्रिकेत ऐकलेली आहे. या ठिकाणी पाणी समस्या गंभीर होत ''पेयजल शून्य'' स्थिती २०१७ साली आली ज्याला आपण 'डे झिरो' म्हणून नाव दिलं.

पेयजल उपलब्धता आणि लोकसंख्या यांची सांगड योग्यरित्या बसवता आली नसल्यामुळे केप टाऊन मध्ये 'डे झिरो' आल्यानंतरही आपण त्यापासून काही धडा घेतला नाही असेच म्हणावे लागेल. कारण ३ महिन्यापूर्वी बंगळूरु शहरात थोड्याफार फरकाने 'डे झिरो' ची स्थिती आली होती.

बंगळूरूने गेल्या वर्षभराच्या कालावधीत शहरात पाण्याने तुंबलेले रस्ते आणि पूरस्थिती असे चित्र एका बाजूला बघितले तर दुसऱ्या बाजूला घरटी २५० लिटर पाण्याची मारामार सुरू असल्याचे चित्र होते.

आपणाकडे पाण्याबाबत ज्या म्हणी आहेत त्याची आठवण आजच्या स्थिती प्रकर्षाने होते. सध्या बंगळूरूमध्ये पाण्यासाठी जो आटापिटा होत आहे आणि जलसंधारण प्रयत्न सुरू करण्यात आली आहेत ते म्हणजे 'तहान लागल्यावर विहीर खोदणं' होय.

शहरातील मोठ-मोठे तलाव बुजवून त्यावर टोलेजंग इमारती उभारताना प्रत्येकाला जाणीव होती की यामुळे आपण पर्यावरणाचं नुसतं संतुलन बिघडवत नाही तर पर्यावरण व्यवस्था बादच करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सध्या 'आडात नाही तर पोहऱ्यात कसं येणार' या म्हणीचा पूर्ण प्रत्यय बंगळूरुवासीयांना आला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या महानगरात नोकरी करताना दरमहा लाखोंचा पगार मिळतो हे आकर्षण असलं तरी जगण्याची मूलभूत गरज अर्थात पाणी नसेल तर काय याचं उत्तर त्यांना शोधावं लागतंय. बक्खळ पैसा कमावला पण तो 'पाण्यासारखा आणि पाण्यासाठीच' खर्च करावा लागतोय हे बंगळूरूचं वास्तव आहे.

शहराचे नियोजन करताना पुढील साधारण २५ ते ५० वर्षात या भागात काय स्थिती असेल याचा अभ्यास गरजेचा असतो. होणाऱ्या विस्तारासोबत अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा विकास झाला पाहिजे अन्यथा नव्याने आकारास येणारी शहरे पांगळी होतात, बकाल होतात. थोड्याफार फरकाने याच प्रकारे सर्वत्र वाटचाल झाल्याने भारतात पहिला धोक्याचा इशारा बंगळूरुमधून आला आहे.

मानव संस्कृतीचा इतिहास बघितला तर स्पष्टपणे समोर येतं की जंगलात जगलेलं आयुष्य असो वा टोळ्यांमधून (टोळी) जगणं त्याही काळी आणि नंतर नागर संस्कृती व शेतीप्रधान समाजाचा विस्ताराचा आधार नद्या आणि पाण्याचे स्रोत हाच राहिलेला आहे. मानव विकासाच्या मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष करून विकासकांनी केलेल्या नवनगरांमध्ये पाणी ही सर्वात मोठी समस्या आहे.

बंगळूरू सारखा धडा समोर आहे जोडीला सर्व विकासाचे नियम पाळणारी देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे. मुंबई महानगर आणि लगतची लोकसंख्या २ कोटींवर पोहोचली असली तरी मुंबई किमान पिण्याच्या पाण्याबाबत आणि एकूणच पाण्याच्या वापराबाबत उत्तमरीत्या विकसित झालेले शहर आहे.

आपणास शहरीकरण आणि पर्यावरण यांचे सर्वोत्तम संतुलन 'सिंगापूर'मध्ये पहायला मिळते. सिंगापूरचे आर्थिक बाबतीत असलेले जगातले स्थान अव्वल आहे. सहाजिकच या ठिकाणी शहर विस्तार अपरिहार्य असताना निसर्गानं दिलेला पाण्याचा प्रत्येक थेंब योग्यरित्या वापरण्याचं कसब सिंगापूरनं दाखवलय.

सिंगापूरचा संपूर्ण विस्तार पावसाचं पाणी साठविण्यासाठी 'बकेट' प्रमाणे होईल असाच राखला आहे. यश मिळणं ही लॉटरी नाही तर त्यामागे नियोजन, जलव्यवस्थापन आहे. हे सिंगापूरचा धडा आपणास शिकवतो. शेती आणि उद्योग यांच्यासाठी पाणी आवश्यक आहे. पाणी नसणाऱ्या ठिकाणी वस्ती निर्माण करायची व त्यासाठी भूजल साठ्याचा उपसा करायचा असं करीत पैशापायी जमिनीची चाळण करून भूजल साठाही आता संकटात आला आहे. ही अंदाधुंद वृत्ती चुकीचीच आहे याचं भान आपण ठेवलं पाहिजे. तो येतोय अशा जागवतोय. तो पाऊस बरसणार हे देखील नक्की पण त्याच्याशी मैत्री करून त्याला आपण साठवलं नाही तर आपण पुन्हा असंच पाण्यासाठी तरसणार हे ही नक्की आता 'पुढच्यास ठेच' लागलीय या म्हणीचा मतीतार्थ जाणून आपण शहाणं व्हावं अन्यथा 'डे झिरो' अटळ आहे.

# संसदेत मंजूर तीन नव्या भारतीय दंड संहिता कायद्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**लोकसभा निवडणूकीच्या काही दिवस आधी संसदेत ब्रिटीश कायदे बदलून पूर्णता भारतीय संसदेने मंजूर केलेले भारतीय दंड संहिता कायदा, भारतीय पुरावा कायदा, भारतीय गुन्हे कायद्याचा मसुदा मंजूर करण्यात आला. मात्र लोकसभा निवडणूका नजरेसमोर ठेवत भाजपाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हा कायदा १ जुलै पासून अंमलात येणार असल्याची घोषणा केली. विशेष म्हणजे संसदेने मंजूर केलेल्या तीन्ही कायद्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी सही करत मंजूरीही दिली.**

दरम्यान, भारतीय दंड संहिता १८६०, भारतीय पुरावा कायदा १८७२ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या जागी संसदेने लागू केलेल्या नवीन फौजदारी कायद्यांना आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (२० मे) रोजी नकार दिला. न्यायालयाने या याचिकेवर सुनावणी घेण्यास अनास्था दर्शविल्यानंतर, याचिकाकर्ते वकील विशाल तिवारी, जे वैयक्तिकरित्या उपस्थित होते, त्यांनी ती मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार याचिका मागे घेतल्याने ती फेटाळण्यात आली. त्यांनी भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम यांना आव्हान दिले जे १ जुलै २०२४ पासून लागू होणाऱ्या आपीसी, आयइए आणि सीआरपीसी ची जागा घेतील. नवीन फौजदारी कायद्यांना २५ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची संमती मिळाल्यानंतर ३ जानेवारी २०२४ रोजी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

# वाराणसीतून पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा मैदानात

**वाराणसी । वृत्तसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसी लोकसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवडणूक लढत आहेत. या मतदारसंघातून हास्य कलाकार श्याम रंगीला यांच्यासह ४१ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतु यातील ३३ जणांचे उमेदवारी अर्ज छाननीत बाद झाले. त्यामुळे आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात मोजकेच उमेदवार मैदानात आहेत.**

या मतदारसंघात अखेरच्या टप्प्यात म्हणजे १ जून रोजी मतदान आहे. पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात काँग्रेसचे उत्तर प्रदेशचे प्रदेशाध्यक्ष अजय राय यावेळीही लढत देत आहेत. त्यामुळे येथे खरी लढत मोदीविरुद्ध अजय राय यांच्यातच होणार आहे. परंतु मागच्या दोन्ही निवडणुकांमध्ये पंतप्रधान मोदी विक्रमी मतांनी निवडून आले आहेत. आता ते तिसऱ्यांदा आपले नशिब आजमावत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये तब्बल ४ लाख ८० हजार मतांनी विजय मिळविला होता. त्या अगोदर २०१४ मध्ये त्यांनी ३ लाख ७२ हजार मतांनी विजय संपादित केला होता. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात इंडिया आघाडीच्या वतीने काँग्रेसचे अजय राय आणि बहुजन समाज पक्षाचे अतहर जमाल लारी लढत देत आहेत. अजय राय उत्तर प्रदेश काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आहेत. ते पाचवेळा उत्तर प्रदेशात विधानसभा सदस्य राहिलेले आहेत. त्यांनी २०१४ आणि २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात निवडणूक लढलेली आहे. दोन्हीही वेळा त्यांना दारुण पराभव स्वीकारावा लागला.

# श्रृंगऋषीगडावरील सप्ताह सांगतेला भाविकांची गर्दी

## महंत सुरेशानंद महाराजांच्या कीर्तनाने झाली सप्ताहाची सांगता

**शिरूर । प्रतिनिधी**

**श्री.क्षेत्र श्रृंगऋषीगड येथे गेल्या आठ दिवसा पासून मोठ्या भक्तीमय वातावरणामध्ये अखंड हरिनाम सप्ताह पार पडत होता त्याची सांगता आज महंत सुरेशानंद महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. या सांगतेच्या कार्यक्रमाला पंचक्रोशीतून हजारो भाविक भक्तांनी उपस्थिती लावली होती.**

वै. महंत तुकाराम महाराज रुपनर यांच्या पाचव्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त शिरूर तालुक्यातील श्री.क्षेत्र श्रृंगऋषीगडयेथे मठाधिपती महंत सुरेशानंद महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शना गेल्या आठ दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह पार पडत होता. या सप्ताहामध्ये गेली आठ दिवस काकडा भजन, श्रीमद्? भगवद्गीता, जगद्गुरु तुकाराम महाराज गाथा भजन, भावार्थरामायण, हरिपाठ, हरीजागर अशा विविध धार्मिक कार्यक्रमाची रेलचल सुरू होती. यामुळे विविध धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून अध्यात्मिक ज्ञान मिळावे यासाठी पंचक्रोशीतून भाविक भक्त गडावरती गेली आठ दिवस उपस्थित राहून ज्ञानमृताचे सेवन करत होते. आलेल्या भाविक भक्ता अधिका अधिक अध्यात्मिक ज्ञान मिळावे यासाठी महंत सुरेशानंद महाराज यांनी महाराष्ट्रभरातील नामांकित कीर्तनकारांची किर्तनही आयोजित केली होती. यामुळे गडावरती गेली आठ दिवस मोठे भक्तिमय



वातावरण अनुभवलेला मिळत होते. या भक्तीमय सप्ताह सोहळ्याची सांगता आज महंत सुरेशानंद महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. या सांगतेच्या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतून संत -महंत, धार्मिक, राजकीय, सामाजिक,क्षेत्रातील मान्यवरांनी आपली उपस्थिती लावून सप्ताह सांगतेचा आनंद लुटला आहे. या सप्ताह सांगतेच्या कार्यक्रमासाठी आष्टी - पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे नेते आ. सुरेश धस, माजी आ. नारायण मुंडे, रासप. जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर, माजी सभापती तुकाराम हाराळे, डॉ. आसाराम मराठे, तिंतरवणीचे सरपंच उद्धव (बापू )खेडकर, रासपाचे माऊली मार्कड,उमेश खेडकर, आदी मान्यवरांशह पंचक्रोशीत हजारो भाविक भक्त उपस्थित होते. यावेळी आलेल्या भाविक भक्तांना महाप्रसादाची पंगती देण्यात आली आहे. या पंगतीचा भाविकांनी मोठ्या श्रद्धेने लाभ घेतला.

### गडाच्या नारळी सप्ताहाची घोषणा

श्री क्षेत्र श्रृंगऋषीगडाचे मठाधिपती महंत सुरेशानंद महाराज यांच्या संकल्पनेतून फिरत्या नारळी सप्ताहाची परंपरा सुरू करण्यात आली आहे. ही परंपरा पुढील म्हणजेच २०२५ पासून आरंभित होत असून फिरत्या नारळी सप्ताहाचे पहिले नारळ पाथर्डी तालुक्यातील आडगाव या गावकऱ्यांनी घेतले आहे हे नारळ घेण्यासाठी आडगावहुन मोठ्या संख्येने गावकरी आले होते. नारळ घेतल्यानंतर आडगावकरांच्या वतीने मोठा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

# इसीसच्या चार दहशतवाद्यांना अटक, गुजरात एटीएसची मोठी कारवाई

**अहमदाबाद । प्रतिनिधी**

**गुजरात एटीएसने दहशतवाद्यांचा घातपाताचा मोठा कट उधळला आहे. अहमदाबाद विमानतळावर इसीसच्या ४ दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. चारही दहशतवादी श्रीलंकेचे नागरिक आहेत, अशी माहिती गुजरात एटीएस ने दिली आहे.**

गुजरात पोलिसांच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४ दहशतवाद्यांना श्रीलंकेतून भारतात मोठा घातपात करण्यासाठी पाठवण्यात आले होते. ते श्रीलंकेहून चेन्नईमार्गे अहमदाबादला पोहोचल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. अहमदाबाद येथून टार्गेटेड ठिकाणी पोहोचण्यापूर्वीच त्यांना गुजरात एटीएसने अटक केली आहे. हे दहशतवादी पाकिस्तानातून येणाऱ्या त्यांच्या हस्तकांच्या आदेशाची वाट पाहत होते, अशीही माहिती समोर आली आहे. या दहशतवाद्यांच्या फोनमधील एनक्रिप्टेड चॅट्स एटीएसच्या हाती लागले आहे. गुजरातमध्ये या चार दहशतवाद्यांना अटक अशा वेळी झाली आहे, जेव्हा सूरत पोलिस आधीच मौलवी सोहेल अबुबकर प्रकरणाचा तपास करत आहेत. दिल्लीप्रमाणेच अहमदाबादमधील ३६ शाळांनाही बॉम्बने उडवून देण्याच्या धमक्या मिळाल्या होत्या. या तपासादरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू सापडली नसली तरी हे दहशतवादी अहमदाबादमध्ये पोहोचल्यानंतर गुजरात पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २१ मे २०२४



# जिल्ह्यात ३१ मे रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

**बीड । प्रतिनिधी**

दि. २३ मे २०२४ रोजी बौध्द पोर्णिमा साजरी होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक १७ मे २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते ३१ मे २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

# सुख शब्दाला सुखी करण्याचं काम संत ज्ञानेश्वर महाराज यांनी केले -राधाकृष्णजी महाराज





**नेकनुर । प्रतिनिधी**

सुख या शब्दाला संत ज्ञानेश्वर महाराजांनी सुखी करण्याचं काम केलं.. पांडुरंगाचे रूप पाहिल्यानंतर माणसाच्या जीवनात खरे सुख प्राप्त होते. असे प्रतिपादन राधाकृष्ण महाराज यांनी केले. श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प शांतीब्रम्ह महादेव महाराज. श्री ह भ प मृदंग महामेरू राम महाराज काजळे, श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे..सहदेव महाराज शास्त्री,नवनाथ महाराज जरुडकर ,ज्ञानेश्वर महाराज बावी,मारुती महाराज चोरमले,रामेश्वर महाराज हांगेवाडीकर, विष्णुपंत महाराज मुंडे नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव यांच्या सह हजारो

## संत बंकटस्वामींच्या दरबारात प्रत्यक्ष पंढरपूर निर्माण..

भावीक भक्तांची उपस्थिती होती. यावेळी महाराजांनी विठ्ठल माझा माझा मी विठ्ठलाचा हे भजन गायल्यानंतर कीर्तन मंडपात प्रत्यक्ष पंढरपूर निर्माण झाले

श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज पुण्यतिथी उत्सव मोठया थाटात सुरू आहे..यात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुच्छ गोवत्सल राधाकृष्णजी महाराज यांनी गुंफले. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या

रूप पाहता लोचनी ! सुख झाले हो साजणी!!
तो हा विठ्ठल बरवा !तो हा माधव बरवा!!
बहुत सुकृताची जोडी! म्हणून विठ्ठली आवडी!!
सर्व सुखाचे आगर! बाप रखुमादेवीवर!!

या रूपाच्या अभंगावर सुंदर असे चिंतन मांडले.

पांडुरंगाचे रूप पाहिल्यानंतर माणसाच्या जीवनामध्ये सुख प्राप्त होते. देव कोणालाही दर्शन देत नाही. तसेच चर्मचक्षने देव दिसतही नाही. देवाला पाहायचे असेल तर भावयुक्त अंतकरणाने तळमळ आणि आतुरता असावी. आतुरता जिज्ञासा आणि देव मिळण्याची उत्कंठा असेल तर शक्य होत..माऊली यां अभंगातून रुप कसे पाहायचे याचे मार्गदर्शन करतात.. देवाकडे जाताना एक अट आहे..

त्यालाच देवाचे दर्शन होते जो फक्त देवालाच पाहण्याची इच्छा लालसा ठेवतो.सुख शब्दला सुखी करण्याचं काम संत ज्ञानेश्वर महाराज यांनी केले..अनेक जन्माचे पुण्य पदरात असेल तर च देवाची भेट होते.. बहुत सुकृताची जोडी म्हणूनही विठ्ठल आवडी. ज्या संताच्या हृदयात देव आहे त्यांची सेवा केली तर देवाला प्राप्त होते. यावेळी उत्तर येतील संत कुंभांना यांची कथा सांगून.. त्यांचा बाप रखमादेवीवर आहे त्यांच्या जीवनात कशाची कमी असेल असे महाराजांनी सोदाहरण पटवून दीले. देवाचे स्मरण केल्याबरोबर देव दुःखातून मुक्ती करून सुखी करतो. त्यामुळे सर्व सुखाचे आगर असलेला पांडुरंग हा विटेवरी उभा आहे असेही महाराजांनी सांगितलं. यावेळी कीर्तनासाठी साथ संगत महाराष्ट्रातील नामवंत गायक वादक मंडळी व बंकट स्वामी महाराज फडावरील सर्व वारकरी , बाल वारकरी, टाळकरी यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करुन ८ महिने झाले परंतु जनतेला शासनाने वाऱ्यावर सोडले -भाई घोलप

**पाटोदा । प्रतिनिधी**

२०२३ च्या खरीप हंगामात पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके वाया गेली. सोयाबीन, तुर, मका, कापुस, मुग, उडीद,कांदा आणि इतर सर्वच पिके जवळपास ८०% उत्पादन कमी झाले आहे. त्यानंतर शासनाने बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला या नंतरच्या काळात सर्वच खरीप पिकाचा किमान ७५% पिकविमा शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असतांना उचल म्हणून २५% अग्रीम विमा बीड जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना मिळाला. शेतकऱ्यांचे लाईटबील संपूर्ण माफ करणे गरजेचे असतांना जिथे विद्युत पंपच चालले नाहीत तिथे शेतकरी लाईट बील कसे भरणार,बँकेकडुन शेतकऱ्याने काढलेले खरीप पीक कर्ज हे पुर्णतः माफ करणे गरजेचे आहे, किमान पीक कर्जाचे पुनगर्ठन करुन नव्याने पीक कर्ज देणे,नवीन खरीप पिकासाठी गरजेचे आहे.जिल्ह्यात दुष्काळामुळे आज बेरोजगारी जास्त वाढत चालली आहे,त्या कष्टकरी मजुरांना प्रत्येक गावच्या शिवारात किमान १०० मजुरांना रोहयोचे काम मिळेल असे कोणतेही नियोजन जिल्हा प्रशासनाने केलेले नाही.आज काही ठिकाणी जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर असतांना चारा छावण्या नाही तर किमान शेतकऱ्याला गाय,बैल,म्हैस,शेळी,मेंढी यांना जगवण्यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे. जनतेला पिण्यायोग्य स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे तो त्याचा अधिकार आहे. परंतु या वरील कोणत्याही विषयावर शासन गांभीर्याने घेत नाही.शासनाने दुष्काळ जाहीर करुन ८ महिने झाले तरी त्याची अंमलबजावणी केलीच नसल्यामुळे एकूणच बीड जिल्ह्यातील जनता मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहे याची तात्काळ दखल शासनाने घ्यावी नसता जनतेला बरोबर घेऊन भारतीय शेतकरी कामगार पक्ष तिव्र आंदोलन करण्यात येईल असे लेखी निवेदन शेकापाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांचे मार्फत राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड मा.ना.धनंजयजी मुंडे साहेब यांना पाठविले आहे. माहितीस्तव मा.जिल्हाकिरी,बीड तसेच शेकापचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील यांनी दिले आहे.

# वडवणी तालुका कृषी असोसिएशनच्या कार्यकारणीची निवड जाहीर

## अध्यक्षपदी शेंडगे, उपाध्यक्षपदी घुगे व सावंत, सचिवपदी मस्के

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुका कृषी साहित्य विक्रेता असोसिएशन च्या अध्यक्षपदी राजेभाऊ शेंडगे यांची निवड करण्यात आली आहे.



वडवणी तालुका कार्यकारणीची महत्वपूर्ण बैठक नुकतीच वडवणी शहरातील आनंद मंगल कार्यालय येथे झाली. या ठिकाणी बैठकीमध्ये सर्व दुकानदारांनी सर्वानुमते कार्यकारणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी राजेभाऊ शेंडगे, उपाध्यक्षपदी बापुराव घुगे व दादासाहेब सावंत, सचिवपदी आसाराम मस्के, सहसचिवपदी सखाहरी आंधळे, प्रसिध्दी प्रमुख पदी रवि लांडे, कोषाध्यक्षपदी बालु मायकर व युवराज लंगे

संचालक मंडळामध्ये बाळासाहेव नागरगोजे, बाळासाहेब आंधळे, सचिन नाईकवाडे, बालाजी आंधळे व सल्लागार पदी ज्येष्ठ उद्योजक, राजमलशेठ नहार, योगेंद्र (आन्ना) मुंडे, संतोष (आन्ना) शिंदे, गणेश (देवा) जोशी यांची सर्वानुमते बिनविरोध निवडी करण्यात आल्या आहेत. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत,सत्कार करण्यात आला. त्यानंतर माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव यांचे स्वागत सर्व कृषी विक्रेत्यांनी केले.यावेळी आजी-माझी पदाधिकाऱ्यासमवेत कृषी विक्रेते बाबासाहेब शेंडगे, पांडूशेठ बारटक्के, संजय शिंदे, बंटी जाधव, तुकाराम जाधव, बंडू शेळके, अशोकराव गोंडे,नारायण जाधव, सिताराम शिंदे रामकिसन टिपरे,दामोधर करांडे,शाहूराजे जाधव,संजय शेंडगे,परमेश्वर पेशवे, जनार्धन मुंडे,हनुमंत गवारे, राहुल यादव,शिवशंकर सावंत,रवि मुंडे,संतोष आंधळे,अनिकेत शेळके,बप्पाकोठुळे,अंकुश शेळके यांच्यासह असंख्य कृषी विक्रेते बांधव उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष राजेभाऊ शेंडगे यांनी शेतकरी व व्यापारी यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी कटीबद्ध आहे, तत्पर राहील अशी ग्वाही दिली.

# संत अज्ञानी जीवाच्या उद्धारासाठीच अवताराला येतात - ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर

**बीड । प्रतिनिधी**

संत केवळ अज्ञानी जीवाच्या उद्धारासाठीच अवताराला येऊन अखंड देह झिजवतात असे प्रतिपादन श्री शिवाजी विद्यालय बीडचे पर्यवेक्षक तथा कीर्तनकार ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले. खांडेपारगाव येथिल श्री क्षेत्र रामगडाच्या अखंड हरिनाम सप्ताहात कीर्तन निरुपणात ते बोलत होते.श्री क्षेत्र रामगडाचे महंत ह.भ.प. गुरुवर्य योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह सुरू आहे. जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांच्या,

गाये नाचे वाहे टाळी साधन कली उत्तम हे
काय जाणो तरले किती नाव आयती या बैसा



या अभंगावर मंत्रमुग्ध करणारे निरूपण त्यांनी केले. संत सामान्य माणसांना झेपेल, पचेल, रुचेल असा सोपा भगवंत प्राप्तीचा मार्ग दाखवितात. आजच्या कलियुगात इतर सर्व वाटा क्षीण झाल्या आहेत. केवळ एकमेव सोपी वाट आहे ती म्हणजे नामस्मरण. भगवंताच्या नामस्मरणाने पूर्व जन्मीचे पाप जळून जाते आणि अगणित पुण्य प्राप्त होते असे दुहेरी लाभ होतात. तेव्हा आळस न करता साधकांनी नामजप करावा. नामजपाचे सामर्थ्य एवढे आहे, की तृणासारखे सर्व पापे भस्म होतात. त्यांनी अतिशय मुद्देसूद व अभ्यासपूर्ण निरूपण केले. या कीर्तनासाठी पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव भाऊ आमटे, श्री क्षेत्र रायगडाचे विश्वस्त ह.भ.प.माणिकराव आमटे, आसाराम महाराज आमटे, वैजनाथ साळुंके , विक्रम आमटे , राजेन्द्र आमटे, दत्ता करपे, प्रदीप आमटे, संजय आमटे, दादासाहेब आमटे, नितिन आमटे यांच्यासह हजारो भाविकांची उपस्थिती होती. संगीतसाथीसाठी गायक बंडू महाराज जटाळ, आसाराम महाराज आमटे, महादेव महाराज रोडे, बलभीम महाराज गवंडे, महादेव महाराज आमटे, महारुद्र महाराज गवंडे, भागवत महाराज सपकाळ, उत्तरेश्वर पुर्भे, गणेश महाराज आमटे, मृदंगाचार्य तालमणी गणेश महाराज आमटे इत्यादी उपस्थित होते.

# स्वाराती रूग्णालयातील मशिन व यंत्रसामुग्री दुरूस्त करून रूग्णांचे हाल थांबवा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांची निवेदनाद्वारे मागणी

येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात मागील अनेक दिवसांपासुन आरोग्य सेवेसाठी आवश्यक असलेल्या विविध मशिन व यंत्रसामुग्री बंद आहेत. त्यामुळे रूग्णांचे मोठे हाल होत आहेत. तरी शासन व प्रशासनाने याबाबत तातडीने पावले उचलावीत आणि सदरील प्रश्नांची सोडवणूक करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी आमदार पृथ्विराज साठे व तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी केली आहे. या प्रश्नी त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाचे अधिष्ठाता यांना सोमवार, दिनांक २० मे रोजी निवेदन दिले आहे.

# कोट्यवाधी रुपयांचा महसूल बुडवत अवैध वाळूचा केला जातोय स्टॉक: जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

## अवैध वाळू स्टॉक शोधण्यासाठी पथक तयार करा बक्षीस जाहीर करा -अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**



टेंडर नसतानाही गेवराई तालुक्यातील मौजे बोरगाव, गुंतेगाव, सुरळेगाव, गुळज, पांचाळेश्वर, राक्षसभुवन, म्हाळस पिंपळगाव, सावळेश्वर, सावरगाव आणि खामगाव येथील गोदावरी नदीपात्रातून केनी, जेसीबी, पोकलेन, विना नंबरच्या टिप्पर, हायवा आशा यंत्राद्वारे रोज भर दिवसा-मध्यरात्री हजारो-लाखो ब्रास अवैध वाळू उपसा केला जात आहे. महसूल, आर.टी.ओ व पोलीस प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या सहमतीने हा सर्व अनागोंदी कारभार चालू आहे.

प्रशासकीय अधिकारीच शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवत असल्याचे दिसत आहे. यासंदर्भात जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समिती तथा जिल्हा अधिकारी बीड यांच्याकडे तक्रार केली होती त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बीड चौकशी चालू आहे.

परंतु एकीकडे चौकशी सुरू असताना मात्र रोज रात्री-मध्यरात्री जिल्हाखनिकर्म अधिकारी, महसुलचे अधिकारी, गेवराई तहसीलदार, आरटीओचे अधिकारी, पाडळशिंगी टोलनाक्याचे मॅनेजर यांच्यासह तेथील कर्मचारी विनानंबरच्या गाड्याची एन्ट्री न करता सोडत आहेत. पाडळशिंगी टोलनाक्यावर गस्त घालणारे वाहतूक पोलीस प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी यांच्या संगनमताने हा अवैध वाळू उपसा चालला आहे. तसेच पावसाळ्याच्या अगोदर अवैध वाळू उपसा करून त्याचा साठा करून ठेवला आहे. जिल्हा प्रशासनाने ते वाळू साठे सांगणाऱ्याना बक्षीस जाहीर करत अवैध वाळू ताब्यात घेऊन कारवाई करावी.

जिल्हाखनिकर्म अधिकारी यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, आरटीओ यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, वाहतूक पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, पोलीस प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष का केले जाते याची सखोल चौकशी करत प्रत्येक विभागाला जिल्हाधिकारी बीड यांच्या सहीचे पत्र काढत कारवाईच्या सूचना द्याव्यात असे वंचितचे युवा नेते अजय सरवदे यांनी तक्रारीत नमूद करून

मा.जिल्हाधिकारी बीड, मा.पोलीस अधीक्षक बीड यांना कळविले आहे.

### पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या कार्यकाळात अवैध धंदे फोफावले त्यांची कामगिरी संशयास्पद

**पोलीस प्रशासन दबावात काम करते असं प्रत्येकाला वाटत असेल पण तसं नाहीये गेल्या २ वर्षात हफ्तेखोरीमध्ये सगळ्यात पुढे असल्याचे दिसून येते. पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिच्चून खुलेआम अवैध वाळू वाहतूक होत आहे. परंतु प्रशासनाला हफ्ते चालू असल्याने कारवाई होत नाहीत हे दुःखद आहे. ''सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'' अर्थ ''चांगल्या लोकांचे रक्षण करेन अन दुष्टांचा नाश करेन'' पण सगळं उलटं होतंय.**

**जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्यावर नेमका कोणाचा दबाव आहे का...?**

जिल्हाधिकारी बीड यांच्या वाहनाला अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने कट मारला होता त्यावेळी गुन्हा दाखल झाला होता पण त्या प्रकरणात पुढे काय झाले? याची कोणालाही माहिती नाही त्याचवेळी जिल्हाधिकारी बीड यांनी कठोर पाऊले उचलली असती तर आज अवैध वाळू उपसा/वाहतूक आटोक्यात आली असती शासनाचा कोट्यवाधी रुपयांचा महसूल बुडाला नसता परंतु जिल्हाधिकारी बीड दबावापोटी काम करतात की काय अशी चर्चा नागरिकांतून होताना दिसून येत आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात हरवत चालले बालपण

**ज्योतीराम पाढंरपोटे । माजलगाव**







## खेड्यातूनही लुप्त होत आहेत खेळणी

१० ते १५ वर्षांच्या पूर्वीचा विचार केल्यास मैदानात मुलांचे सुरू असलेले खेळ, प्रत्येकाच्या घरावर डौलाने मिरविणारा एन्टिना, ५-१०-२५ पैशांची नाणी आणि त्यातून मिळणारा आनंद,हे चित्र दिसत होते.पण सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात हे सर्व खेळ व वस्तू लुप्त झाल्याचे चित्र आहे.त्यामुळे आजकाल आधुनिकतेच्या नावाखाली बालकांचे बालपण हरवत चालले आहे. पारंपरिक खेळांतील वस्तूंच्या आठवणी ताज्या करण्या करिता सध्या केवळ चित्र आणि फोटोच उरले आहेत.

सध्या व्हॉट्सॲप या अप्लिकेशनच्या माध्यमातून हे जुने फोटो एकमेकांना पाठवून तो काळ पाहिलेले युवक व वृद्ध जुन्या आठवणींना उजाळा देत असल्याचेच दिसून येत आहे.

दहा ते पंधरा वर्षांपूर्वी मैदानातील खेळांना अनन्य साधारण महत्त्व होते.यात सर्वच खेळांचा समावेश होत असला तरी सध्या केवळ क्रि केट हाच खेळ चिमुकले खेळताना दिसतात.पूर्वी विटू-दांडू हा खेळ मुलांमध्ये प्रसिद्ध होता.हल्ली हा खेळ कुठेही खेळला जात नसून त्यासाठी मैदानेही नाही, अपवादात्मक खेड्यांमध्ये दिसून येईल,हे वास्तव आहे. लगोरी,लंगडी या खेळांचा प्रकार असलेला सातघर हे खेळ मुलींमध्ये त्या काळी प्रसिद्ध होते. सध्या मुलं-मुली प्रगत झाल्यागत वागत असल्याने हे जुनाट खेळ खेळले जात नाही.पूर्वी गल्ली-बोळात खेळले जाणारी लगोरी, लंगडी व फुगडी,दोरी हे खेळ आता दिसेनासे झाले आहेत.आता मुला-मुलींमध्ये संगणक, मोबाईलवरील खेळांसह टीव्हीवरील व्हिडीओ गेम अधिक प्रसिद्ध झाले आहेत. बसल्या जागेवर खेळले जाणारे हे खेळ मुले खेळतात.

यात शरिराला कुठलाही व्यायाम होत नाही.उलट विकार वाढण्यास आणि शारीरिक विकास खुंटण्यास हे खेळ कारणीभूत ठरत आहेत. मानसिकरित्या नवीन पिढी प्रगत घडत असली तरी दिवसेंदिवस शारीरिकदृष्ट्या दोष असलेली मुले-मुली अधिक आढळून येत आहेत. मुलांमध्ये विटू-दंड्यासह भोवरा हा खेळही मोठाच प्रसिद्ध होता. एकट्यानेही तो खेळता येत होता आणि चार-चौघे जमले तर त्यात धम्माल असायची. पण सध्या प्लास्टिकचे भोवरे बाजारात मिळतात. या भोवऱ्यांना दोराने फिरवावेही लागत नाही. त्यासाठी तत्सम यंत्रही मिळते. यातही शरिराला व्यायामासाठी कुठेच वाव नाही. शाळांमध्ये कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल, फुटबॉल यासह अन्य खेळ खेळविले जात असून स्पर्धाही घेतल्या जातात. तेवढाच विद्यार्थ्यांना व्यायाम होतो; पण या मातीतील खेळातून होणारी कसरत बंद झाल्याचे चित्र आहे. हल्ली मोबाईलवरील व्हॉट्सॲपवरच मुला-मुलींच्या विविध खेळांतील गमती-जमती होत असल्याने बालकांना पूर्वीसारखे पारंपरिक खेळ खेळण्यास मिळत नाही.त्यामुळे बालपण हरवत आहे.

पान ६ वरून...

## आष्टीतून पंकजाताईना ३०

देखील टक्का वाढला आहे.यामध्ये आमदार सुरेश धस यांनी आपली सर्व ताकत लावून जीवाचे रान करून थोडे बहुत मतदान रोखण्यास यश मिळवले. मात्र बजरंग सोनवणे यांना गावागावात मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर कसलाही भूत प्रमुख नसताना देखील मतदान झाल्याचे बोलले जात आहे. मागच्या पंचवार्षिक ला खासदार प्रीतम ताई मुंडे यांना ७१ हजार ची लीड मिळाली होती मात्र ती लीड आता अवघ्या २५ ते ३० हजारावर येईल असे अनेक जाणकार व्यक्तींचे मत आहेत.. त्याचबरोबर लोकांनी गाव गावच्या मतदानाची दिलेल्या माहितीवरून पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना आष्टी विधानसभा मतदारसंघातून २५ ते ३० हजाराची लीड जाईल असे अंदाज वर्तवले जात आहेत.. बीड जिल्ह्यामध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघालाच मनोज तरंगे यांच्या माध्यमातून का टार्गेट केले गेले हेही आष्टी विधानसभा मतदारसंघात चर्चेचा विषय बनला होता ज्या ठिकाणी आमदार सुरेश धस हे मराठा गावात जाऊन जनजागृती करून यायचे त्याच ठिकाणी मनोज जरांगे हे जाऊन पुन्हा एकदा आरक्षणाचा वनवा पेटायचे यावरून आष्टी मतदार संघात मराठ्याचे मतदान रोखण्यास मनोज रंगला यश मिळाले का आमदार सुरेश धस यांना ही येणाऱ्या चार तारखेच्या निकालावरच कळेल.

cmyk

# कोल्ड स्टोरेः शेतकऱ्यांना पैसा मिळवून देणारा व्यवसाय

शेती आणि शेतीशी संबंधित अनेक प्रकारचे उद्योग आहेत. कृषी क्षेत्राची व्याप्ती ही खूप मोठी असल्या कारणाने अनेक उद्योग व्यवसाय उभारण्यासाठी यामध्ये संधी आहेत. शेती क्षेत्रातील उत्पादित मालाशी संबंधित देखील अनेक प्रकारचे प्रक्रिया उद्योग आपल्याला उभारता येतात. असाच एक चांगला नफा देणारा व्यवसाय शेतकरी करू शकतात. तो म्हणजे कोल्ड स्टोरेजचा व्यवसाय होय. शेतीमध्ये उत्पादित होणारा भाजीपाला, फळे हे नाशवंत असल्यामुळे त्यांची साठवण्याची सुविधा असणे खूप गरजेचे असते. याच पार्श्वभूमीवर ग्रामीण किंवा निमशहरी भागात कोल्ड स्टोरेज उभारता येऊ शकतात.

हा 'कोल्ड स्टोरेज'चा व्यवसाय सुरु करायचा असेल तर यासाठी तुम्हाला तुमच्या परिसरात असणाऱ्या बाजारपेठेचा चांगला अभ्यास करून घेणे खूप गरजेचे आहे. त्यासोबतच तुम्ही राहत असलेल्या दहा ते पंधरा किलोमीटर पट्ट्यात कुठल्या प्रकारच्या फळांची व भाजीपाल्याचे उत्पादन होते. तसेच दुग्ध व्यवसाय किती प्रमाणात आहे. किंवा एखाद्या मत्स्य किंवा चिकन किंवा मटण मार्केट इत्यादी गोष्टींकडे खूप काळजीपूर्वक लक्ष देऊन अभ्यासणे गरजेचे आहे.



'या' व्यवसायासाठी आवश्यक गोष्टी :

'हा' व्यवसाय सुरू करण्यासाठी तुम्हाला फॅक्टरी लायसन्स, फायर अँड पॉल्युशन डिपारमेंट आणि हॉर्टिकल्चर बोर्डाचे परमिशन, जीएसटी नंबर आणि उद्योग रजिस्ट्रेशन आवश्यक आहे. कोल्ड स्टोरेज उभारतांना त्याची क्षमता पाच मेट्रिक टन मालाची करायचे असेल तर त्यासाठी ५० ते ६० स्क्वेअर फुटांची जागा लागते व विजेचा पुरवठा हा २४ तास राहील हे खूप महत्त्वाचे असते. या व्यवसायासाठी दहा ते बारा कामगारांची आवश्यकता असते. यामध्ये दुसऱ्या शेतकऱ्यांचा उत्पादित माल भाड्याने तुमच्या कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवू शकतात किंवा स्वतःचे उत्पादन देखील ठेवू शकता. यामध्ये चांगली कमाई होते. व्यवसायासाठी लागणारे भांडवल : हा व्यवसाय सुरू करण्यासाठी तुम्हाला दहा ते बारा लाख रुपये भांडवल लागते.

लागणारी यंत्रसामुग्री : 'कोल्ड स्टोरेज' व्यवसायात प्रामुख्याने कोल्ड स्टोरेज यंत्रसामुग्रीची आवश्यकता भासते व यंत्रसामग्री तुम्हाला अडीच ते तीन लाख लाखापर्यंत मिळू शकते.

मनुष्यबळ : या व्यवसायासाठी तुम्हाला पाच ते सहा मनुष्यबळाची आवश्यकता असते. ग्राहक कसे मिळवाल : तुम्ही मार्केटमध्ये जाऊन शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना तुमच्या कोल्ड स्टोरेजची माहिती देऊ शकता. तसेच दूध उत्पादन करणाऱ्या कंपन्यांकडून स्टोरेजसाठी माल भाड्याने घेऊ शकतात. तसेच वेगवेगळे मॉल्स, भाजीपाला आणि फळे पिकवणारे शेतकऱ्यांकडून देखील ऑर्डर मिळू शकते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८१ : वॉशिंग्टन (डी. सी.) येथे अमेरिकन रेड क्रॉस ची स्थापना झाली.
१८८१ : युरोपीय देशांतील गृहयुद्ध संपल्यानंतर क्लारा बार्टन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून अमेरिकेतील वॉशिंग्टन डी.सी. मध्ये अमेरिकन रेड क्रॉसची स्थापना केली.
१९०४ : पॅरिसमध्ये फेड्रेशन इंटरनॅशनल डी फुटबॉल असोसिएशन (फिफा) ची स्थापना झाली.
१९२७ : चार्ल्स लिंडबर्ग यांनी एकट्याने जगातील पहिले न थांबता अटलांटिक महासागर पार करणारे उड्डाण पूर्ण केले.
१९३२ : अमेलिया इअरहार्ट ह्या अटलांटिक महासागर एकटयाने पार करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.
१९७० : अमेरिका राष्ट्राने देशांत आण्विक शास्त्राची चाचणी केली.
१९९१ : पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीपेरांबदुर येथे आत्मघातकी पथकाने हत्या केली.
१९९२ : चीनने १,००० किलो टन क्षमतेच्या अणुबॉम्बची यशस्वी चाचणी केली. हा जगातील सर्वात शक्तिशाली अणुस्फोट आहे.
१९९४ : ४३ व्या जागतिक सौंदर्य स्पर्धेत मिस इंडिया सुश्मिता सेनने मिस युनिव्हर्स हा किताब पटकावला. हा किताब मिळवणारी ती पहिलीच भारतीय आहे.
१९९६ : सांगली जिल्ह्यातील माधवराव पाटील हे ब्रिटन मधील इलिंग शहराचे महापौर झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७१ : आल्ब्रेख्त ड्यूरर, जर्मन चित्रकार.
१५२७ : फिलिप दुसरा, स्पेनचा राजा.
१७९२ : गुस्ताव कोरियोलिस, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ
१९१४ : जगातील सर्वात जास्त उंचीचे माउंट एव्हरेस्ट शिखर प्रथम चढून जाण्याचा मान मिळवणारे शेर्पा तेनसिंग यांचा नेपाळमधील थामी गावी जन्म..
१९१६ : अमेरिकन कादंबरीकार हेरॉल्ड रॉबिन्स यांचा जन्म. (मृत्यू: १४ ऑक्टोबर १९९७)
१९२१ : आंद्रेई सखारोव्ह, रशियन भौतिकशास्त्रज्ञ.
१९२२ : प्रसिद्ध अमेरिकन आंतरराष्ट्रीय व्यावसायिक कोर्टाचे न्यायाधीश जेम्स लोपेझ वॉटसन यांचा जन्मदिन.
१९२३ : स्विस गणितज्ञ अर्मांड बोरेल यांचा जन्म. (मृत्यू: ११ ऑगस्ट २००३)
१९२८ : कला समीक्षक व लेखक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१०)
१९३० : माल्कम फ्रेझर, ऑस्ट्रेलियाचा २२वा पंतप्रधान.
१९३१ : हिन्दी कवी, लेखक व उपहासकार शरद जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९१)
१९४४ : मेरी रॉबिन्सन, आयर्लंडची राष्ट्राध्यक्ष.
१९५६ : अभिनेता रविन्द्र मंकणी यांचा जन्म.
१९५८ : भारतीय-अमेरिकन फॅशन डिझायनर नइम खान यांचा जन्म.
१९६० : दक्षिण भारतीय अभिनेता मोहनलाल यांचा जन्म.
१९७१ : प्रख्यात भारतीय चित्रपट निर्माता व पटकथा लेखक आदित्य चोपडा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४७१ : इंग्लंडचा राजा हेन्री (सहावा) यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १४२१)
१६८६ : वातावरणाबाबत मूलभूत सिद्धांत मांडणारे जर्मन पदार्थवैज्ञानिक ऑटो व्हॉन गॅरिक यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १६०२)
१९२९ : आर्चिबाल्ड प्रिमरोझ, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
१९७३ : बाळकृष्ण ढवळे, मराठी मुद्रण व प्रकाशन क्षेत्रातील व्यवसायिक.
१९७९ : स्वातंत्र्य वीरांगना जानकीदेवी बजाज यांचे निधन. (जन्म: ७ जानेवारी १८९३)
१९९१ : भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या. (जन्म: २० ऑगस्ट १९४४)
१९९३ : ब्रिटीश सैन्य दलातील हवाई अधिकारी मेजर जनरल जॉन डटन ''जॉनी'' फ्रॉस्ट यांचे निधन.
१९९८ : इंटकचे सोलापुरातील नेते आबासाहेब बाबूराव किल्लेदार यांचे निधन.
२००० : हर्बालाइफ कंपनी चे स्थापक मार्क आर. ह्यूजेस यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९५६)
२००२ : सुलतान अहमद, निर्माते दिग्दर्शक.
२००५ : बंगाल वंशीय सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट निर्माता व दिग्दर्शक सुबोध मुखर्जी यांचे निधन.

# असे करा खरीप पिकांमध्ये आंतरमशागतीचे नियोजन



चांगल्या पिकांसाठी व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने खरीप पिकातील आंतरमशागतीचे महत्व आणि नियोजनाविषयी माहिती दिली आहे. ही माहिती नक्कीच शेतकऱ्यांना उपयोगी पडेल. पिकामध्ये तणांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी तसेच मातीतील ओलावा टिकवण्यासाठी कोळपणी करणे गरजेची आहे. तणांच्या प्रादुर्भावानुसार आणि पिकांच्या प्रकारानुसार साधारणतः २ ते ३ कोळपण्या नंतर दुसऱ्या आठवड्यापासून पाचव्या-सहाव्या आठवड्यापर्यंत कोळपणी करावी. पेरणी झाल्यानंतर पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि गरजेनुसार विशेषतः नत्रयुक्त खतांचा वापर केला जातो. खुरपणी किंवा कोळपणी झाल्यानंतर खत मातीत मिसळेल अशा पद्धतीने द्या. परंतु खत दिल्यानंतर पिकाला पाणी द्यायला विसरू नका.

पिकांच्या दोन ओळीत सेंद्रिय पदार्थ वापरा. उदा. गव्हाचे काड, बाजरीचे सरमाड, तुरकाठ्या, ज्वारीची धसकटे, उसाचे पाचट, पिकांचा टाकाऊ भाग इत्यादी आच्छादन म्हणून वापरा. साधारणपणे प्रती हेक्टरी पाच टन या प्रमाणात सेंद्रिय आच्छादकाचा वापर करा. आच्छादनामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन जमिनीतील ओलावा टिकून राहील. तणांचा प्रादुर्भाव कमी करणे, जमिनीचे तापमान नियंत्रित राखणे इत्यादींचा फायदा होतो.

आंतरमशागतीचे नियोजन :१) आंतरमशागतीची कामे झाल्यावर तूर, कपाशीमध्ये दर दोन ओळीनंतर सऱ्या काढा. या सऱ्या मुळे सप्टेंबर, ऑक्टोबरमध्ये पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी उपयोग होतो. तुरीच्या जोमदार वाढीसाठी १५ दिवसांनी खुरपणी करा. अधिक उत्पादनासाठी पीक पेरणीनंतर ३० ते ४५ दिवस शेतात तण येऊ देऊ नका.२) सोयाबीन पिकाची लागवड रुंद वरंबा सरीवर केली असल्यास रिकाम्या सरीमध्ये तण राहणार नाही याची काळजी घ्या.३) हुलगा, मटकी, चवळी आणि राजमा ही पिके २० ते २५ दिवसांचे असतांना पहिली कोळपणी आणि ३० ते ३५ दिवसांचे असताना दुसरी कोळपणी करा. पेरणीनंतर ३० ते ४५ दिवस पीक तणविरहीत ठेवा. ४) भुईमूग पिकामध्ये १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या करा व दोन खुरपण्या घ्या. शेवटची कोळपणी थोडी खोल द्यावी. त्यामुळे पिकास मातीची भर मिळते. भुईमुगाच्या आऱ्या जमिनीत जाण्यास सुरवात झाल्यानंतर आंतरमशागत करू नका. ५) भाजीपाला पिकांमध्ये आवश्यकतेनुसार खुरपणी करून पीक तणविरहित ठेवा. फुले येण्याच्या सुमारास झाडांना भर लावा म्हणजे झाडे कोलमडणार नाहीत. आवश्यकतेनुसार वर खतांच्या मात्रा द्या. वेलींना वळण देण्यासाठी ताटी उभारू शकता. यातून भाजीपाला वाढण्यास मदत होईल.

# शेतात जिप्समचे फायदे आणि वापरण्याची पद्धत

जिप्सम किंवा माती सुधारकचा वापर माती परीक्षण केल्यानंतरच करा. जमिनीच्या गरजेनुसार अर्धा भाग जिप्सम शेणात मिसळून पहिल्या वर्षी आणि अर्धा भाग दुसऱ्या वर्षी टाकावा. जिप्सम जोडताना, त्यात सोडियम आयनचे प्रमाण १% पेक्षा जास्त नसावे. शेत सुपीक करण्यासाठी शेतकरी अनेक प्रकारची खते आणि खतांचा वापर करतात.

याचे मुख्य कारण म्हणजे जमीन सुपीक बनवणे जेणेकरून पिकाचे उत्पादन आणि गुणवत्ता दोन्ही चांगले राहतील. अशा परिस्थितीत शेतकरी रासायनिक खतांव्यतिरिक्त सेंद्रिय खतांचाही वापर करतात. अशा परिस्थितीत जर तुम्हालाही शेत सुपीक बनवायचे असेल तर तुम्ही शेतात जिप्समचाही वापर करू शकता. जाणून घेऊया त्यांचे काय फायदे आहेत आणि कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात.

जिप्सम म्हणजे काय? : जिप्सम हे माती सुधारण्याचे खत आहे, ज्यामध्ये सल्फर १८.६%, कॅल्शियम २३.३%, कॅल्शियम कार्बोनेट आणि जिप्समची शुद्धता ७६% आहे. माती सुधारण्यासाठी आणि ती सुपीक करण्यासाठी वापरली जाते.

जिप्सम कसे कार्य करते? : जमिनीत जिप्सम खत घातल्यानंतर, जिप्सम मातीमध्ये उपस्थित असलेल्या क्षारांवर प्रतिक्रिया देते आणि परिणामी सोडियम सल्फेट आणि कॅल्शियम ऑक्साईड तयार होते. सोडियम सल्फेट विद्राव्य असल्यामुळे जमिनीतून पाण्याचा निचरा होतो आणि जमिनीची पीएच पातळी नियंत्रित राहते, त्यामुळे जमिनीची सुपीकता सुधारते.

जिप्सम योग्यरित्या कसे वापरावे : तुम्ही एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी की जिप्सम किंवा माती सुधारकचा वापर माती परीक्षण केल्यानंतरच करा. जमिनीच्या गरजेनुसार अर्धा भाग जिप्सम शेणात मिसळून पहिल्या वर्षी आणि अर्धा भाग दुसऱ्या वर्षी टाकावा. जिप्सम जोडताना, त्यात सोडियम आयनचे प्रमाण १% पेक्षा जास्त नसावे. जिप्सम नांगरलेल्या शेतात लावावे आणि रोटाव्हेटरच्या साहाय्याने जमिनीत चांगले मिसळावे, परंतु सपाट जमिनीवर ते किमान २० सें.मी. मातीत मिसळावे, कारण पावसानंतर जिप्सम लवकर पाण्यातून फिरते.

जिप्समचे फायदे काय आहेत? : पिकाची कॅल्शियम आणि सल्फरची गरज पूर्ण होते. वनस्पतींचा विकास आणि वाढ एकसमान आहे. जिप्सममध्ये सल्फर असल्याने पिकांवर परिणाम करणारे रोग नियंत्रणात येतात. तेलबिया पिकांमध्ये तेलाचे प्रमाण वाढवण्यासाठी जिप्सम खूप फायदेशीर आहे. जमिनीत जिप्समचा वापर केल्यास नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, कॅल्शियम आणि सल्फरचे प्रमाण वाढते, त्यामुळे उत्पादन वाढते. जमिनीत जिप्समचा वापर केल्यास पाण्याचा निचरा आणि वाहतूक क्षमता वाढते. मातीची पीएच पातळी नियंत्रित करण्यास मदत करते.

या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या : उच्च आर्द्रता असलेल्या ठिकाणी जिप्सम ठेवू नका. माती परीक्षण अहवालानुसार जिप्सम वापरा. वारा खूप जोरात असताना जिप्सम वापरू नका. जिप्सम गुठळ्या बारीक करून शेतात टाका. जिप्सम घालताना हात कोरडे असावेत. जिप्सम टाकल्यानंतर ते जमिनीत चांगले मिसळा. जिप्सम मुलांपासून दूर ठेवा. उभ्या पिकांमध्ये दाणेदार जिप्सम वापरा.





# गाजर गवत फेकून देऊ नका, या सोप्या पद्धतीने घरीच कंपोस्ट तयार करा

गाजर गवतापासून कंपोस्ट खत तयार करताना शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाजर गवत कंपोस्ट खताचा वापर केल्यास शेतात गाजर गवत अधिक वाढेल, असे त्यांना वाटते. गाजर गवतापासून काही शेतकऱ्यांनी अशास्त्रीय पद्धतीने कंपोस्ट खत तयार केल्याने हा संभ्रम निर्माण झाला आहे.

गाजर गवताला काँग्रेस गवत असेही म्हणतात. आज भारतात हे तण केवळ शेतकऱ्यांसाठीच नाही तर प्राणी, पर्यावरण आणि जैवविविधतेसाठीही मोठा धोका बनत आहे. आधुनिक शेतीमध्ये रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मानवी आरोग्यावर आणि पर्यावरणावर होणारे घातक परिणाम कोणापासूनही लपलेले नाहीत. जमिनीची सुपीकता सातत्याने कमी होत आहे. रासायनिक खतांचे पर्यावरणावर आणि मानवावर होणारे दुष्परिणाम पाहता सेंद्रिय खतांचे महत्त्व वाढत आहे. गाजर गवतापासून सेंद्रिय खत बनवून आपण पर्यावरणाचे रक्षण करून पैसेही कमावू शकतो. संशोधनात असे आढळून आले आहे की, खुल्या खड्ड्यांत किंवा तलावात गाजराच्या गवतापासून कंपोस्ट खत तयार केले जाते तेव्हा त्याच्या सूक्ष्म बिया नष्ट होत नाहीत. परंतु, गाजर गवतापासून शास्त्रीय पद्धतीने कंपोस्ट खत तयार केल्यास ते सुरक्षित कंपोस्ट आहे.

गाजर गवतापासून कंपोस्ट खत तयार करण्याची पद्धत :

थंडी आणि उष्णतेला असंवेदनशील असलेल्या गाजर गवताच्या बियांमध्ये सुप्तता नसल्यामुळे, फुलांची आणि फुल नसलेली गाजर गवताची रोपे एकाच वेळी शेतात दिसतात. गाजर गवत कंपोस्ट तयार करण्यासाठी वापरण्यासाठी, शेतकऱ्यांनी फुलांचे प्रमाण कमी असताना ते उपटून टाकण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत. गाजर गवत जेवढे लवकर उपटले जाईल तेवढी पिकाची उत्पादकता वाढेल. अशा प्रकारे गाजर गवतापासून कंपोस्ट खत तयार करता येते.

शेतात ३ बाय ६ बाय १० फूट (खोली - रुंदी - लांबी) आकाराचा खड्डा बनवा. तुम्ही तुमच्या सोयीनुसार लांबी आणि रुंदी वाढवू किंवा कमी करू शकता आणि शेतात गाजर गवताचे प्रमाण वाढवू शकता, परंतु खोली तीन फुटांपेक्षा कमी असावी. गाजर गवत त्याच्या मुळांसह तुमच्या शेतातील पिकांमधून, कड्यावरून आणि जवळपासच्या ठिकाणाहून उपटून टाका आणि खड्ड्याजवळ गोळा करा. खड्ड्याजवळ ७५ ते १०० कि.ग्रॅ. कच्चे शेणखत, ५-१० किलो युरिया किंवा रॉक फॉस्फेटची पिशवी, माती (एक किंवा दोन क्विंटल) आणि पाण्याचा ड्रम अशी व्यवस्था करावी. खड्ड्याच्या संपूर्ण लांबी आणि रुंदीच्या पृष्ठभागावर सुमारे ५० किलोग्रॅम गाजर गवत पसरवा. ५-७ किलो शेण २० लिटर पाण्यात विरघळवून गाजर गवताच्या थरावर फवारणी करावी. त्यावर ५०० ग्रॅम युरिया किंवा ३ किलो रॉक फॉस्फेटची फवारणी करावी. सेंद्रिय शेतीत खत वापरायचे असेल तर युरिया टाकू नये. उपलब्ध असल्यास, ट्रायकोडर्मा व्हिरिडी किंवा ट्रायकोडर्मा हर्झियानम नावाच्या बुरशीचे कल्चर पावडर ५० ग्रॅम प्रति थर या दराने घाला. यामुळे मोठ्या गाजर गवताच्या झाडांचे विघटन वेगाने होते. आणि कंपोस्ट लवकर तयार होते. वरच्या पृष्ठभागापासून एक फूट वर खड्डा भरेपर्यंत एका थराच्या वर दुसरा-तिसरा आणि इतर थर तयार करा. वरचा थर अशा प्रकारे दाबा की पृष्ठभाग घुमटाचा आकार होईल. थर लावताना गाजर गवत पायाने व्यवस्थित दाबावे. अशा प्रकारे भरलेला खड्डा शेण, माती, पेंढा इत्यादींच्या मिश्रणाने व्यवस्थित बंद करा. ५-६ महिन्यांनी खड्डा उघडल्यास चांगले कंपोस्ट खत मिळते.

आतापर्यंतच्या तुलनात्मक संशोधनात असे आढळून आले आहे की गाजर गवतापासून बनवलेल्या कंपोस्टमध्ये मुख्य पोषक घटकांचे प्रमाण शेणाच्या दुप्पट आणि गांडुळाच्या खताच्या जवळपास असते. गाजर गवतापासून कंपोस्ट तयार करणे हा त्याच्या वापरासाठी चांगला पर्याय आहे.




# बिंदुसरा नदी पात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका

## मान्सुनपुर्व साफसफाई करण्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

बीड:- मान्सून कालावधीत पुर अथवा वादळांमुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची दाट शक्यता असते या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून आधिका-यांच्या बैठका घेण्याचा सपाटा लावत संबंधित कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करते मात्र बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील फ्लड झोन (पुर नियंत्रण रेषा) मध्ये सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकाम आणि नदीपात्रातील उगवलेल्या बाभळीमुळे नदीपात्रात अरूंद झाले असुन झाडांना पाणी आडुन शहरात शिरण्याची दाट शक्यता असुन बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका असुन त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे त्यामुळे एकंदरीत आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठका नेहमीप्रमाणेच वांझोट्या ठरणार आहेत.त्यामुळे संबंधित प्रकरणात तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे , शिवशर्मा शेलार , रामनाथ खोड यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांना केली आहे.







बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील पुर नियंत्रण क्षेत्रातील भुमाफियांकडुन करण्यात आलेल्या व सुरू असलेल्या अनाधिकृत बांधकामाकडे नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असुन बीड शहरातील नदी नाले,ओढे यांच्यावर राजकीय पुढारी, कार्यकर्ते, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड, नगररचनाकार,भुमिअभिलेख, जलसंपदा विभाग कार्यालय यांनी संगनमतानेच भुमाफियांशी आर्थिक लाभातुन हातमिळवणी केली आहे.बीड शहरातील नदी,नाले,ओढे यांचे सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे.सर्व्हेक्षण नसल्याने रेडफ्लर्ड लाईन व ब्लूलाईन हा पट्टा ठरविण्यात आला नसल्याने नगरपरिषद प्रशासन याचा गैरफायदा घेत असुन अतिक्रमित बांधकाम प्रकरणी कंत्राटदार व जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

महापुर येण्यास पुरक्षेत्रातील अतिक्रमणे, अवैध बांधकाम कारणीभूत असुन त्यामुळे पुरबाधित क्षेत्र असलेल्या ब्लु आणि रेड झोनमध्ये बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये असे मुख्यमंत्री यांचे स्पष्ट आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. १९८९ साली अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक भागात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक व जिवितहानी झाली होती आणि २०१४ आणि २०२१ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरात पुर सदृश स्थिती निर्माण झाली होती. मोठ्या प्रमाणात नागरीकांना याचा फटका बसला होता.शहरातील विविध भागांमध्ये पाणी शिरल्याने शहरवासीयांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले होते. बिंदुसरा नदीपात्रा शेजारील राहणा-या तब्बल ३०० घरांना महापुराचा धोका असुन नगरपालिकेकडुन कोणतीही उपाययोजना करण्यात येत नाही.यापुर्वीही अशा दुर्घटना घडुन वित्तहानी व जिवितहानी झालेली असुन शहरातील मोमीनपुरा, खासबाग,जुना मोंढा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,पेठ बीड भागातील लोकांची पुर आल्यानंतर तारांबळ उडते. त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी. बिंदुसरा नदीपात्रात मोठमोठी बाभळीची झाडे उगवली आहेत.त्यामुळे नदीचे पात्र अरूंद व अस्वच्छ झाले आहे.या झाडांना पाणी अडुन पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे तातडीने साफसफाई करण्याची आवश्यकता आहे. शहरातील आसपासच्या भागातील कचरा,घाण पाणी तसे रूग्णालयातील घातक कचरा उचलुन बिंदुसरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पात्र अरूंद होण्याबरोबरच नागरीकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन रूग्णालयातील जैविक घातक कच-यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

## थोडक्यात

### रंजित घाडगे, दिनकर जाधव यांची निवड



केज : राष्ट्रीय स्तरावर संपूर्ण देशभर काम करणार्या पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुका अध्यक्षपदी रंजीत घाडगे तर सचिव पदी दिनकर जाधव यांची निवड करण्यात आली आहे. पुरोगामी विचारांचा वारसा जपण्यासाठी व पुरोगामी विचारांची चळवळ तेवत ठेवण्यासाठी या पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली असून गेल्या सहा वर्षांमध्येच या पत्रकार संघाच्या शाखा संपूर्ण देशामध्ये प्रत्येक राज्यामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापन झाल्या आहेत. याच विचाराचा प्रचार आणि प्रसार तसेच पत्रकारांच्या हितासाठी योग्य निर्णय व्हावेत यासाठीच संस्थापक अध्यक्ष विजय सुर्यवंशी यांनी पुरोगामी पत्रकार संघाची स्थापना केली आहे. याच पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुकाध्यक्षपदी रंजीत तात्याराम घाडगे यांची पुनर्निवड करण्यात आली आहे तर दिनकर किसनराव जाधव यांची केज तालुका सचिव पदावर निवड करण्यात आली आहे. त्यांना निवडीचे पत्र नांदेड येथे शनिवार दि.१८ मे रोजी झालेल्या पुरोगामी पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनामध्ये संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राज्य अध्यक्ष संतोष जाधव, मडाठवाडा प्रदेश उपाध्यक्ष मुबाशीर खतिब तसेच बीड जिल्हा अध्यक्ष दत्ता मुजमुले यांच्या हस्ते देण्यात आले. या त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे हितचिंतक, मित्र, नातेवाईक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळीकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### जातीवाचक शिवीगाळ आरोपातून अटकपूर्व जामीन

धारूर : जातीवाचक शिवीगाळ करून मारहान केल्या प्रकरणी सोनीमोहा येथील मेघराज बालासाहेब मुंडे यांचा अटकपुर्व जामीन केज जिल्हा सत्र न्यायालयात मंजूर झाला आहे. मौजे सोनिमोहा ता.धारूर येथील मेघराज बालासाहेब मुंडे यांनी गावातीलच फिर्यादी यांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी पोलिस स्टेशन धारूर येथे गु.र. नं.१०३/२०२४ कलम ३२४,५०४,५०६ भा. दं. वि व कलम ३(१)(),३(१)() अट्रोसिटी ॲक्ट प्रमाणे दि.२०-०४-२०२४ रोजी गुन्हा केला होता सदर प्रकरणात आरोपीने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश केज यांचे न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळणेसाठी ॲड.डी.एच. मायकर यांचे मार्फत अर्ज दाखल केला व सदर प्रकरणात मा.जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश साहेब केज यांनी आरोपीस योग्य त्या अटी व शर्तिसह अटकपूर्व जामीन मंजूर केला.

### गोरक्षनाथटेकडी येथे बाळकृष्ण दळवी यांचे कीर्तन

बीड (प्रतिनिधी):- विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २६ व्या वर्षातील नवव्या पुण्यतिथी वैशाख शुद्ध. पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. बाळकृष्ण महाराज दळवी चांभुडीकर ता.जि.नगर यांचे गुरुवार दिनांक २३ मे २०२४ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मंडळी जुजगव्हाण ता. जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# बनसारोळा प्राथमिक आरोग्य केंद्राला दर्जावाढ

## आ. नमिता मुंदडा यांची माहिती ; तीस खाटाच्या ग्रामीण रुग्णालयात होणार रूपांतर

केज / प्रतिनिधी :

बनसारोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुणालयाचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे या निर्णयामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रास दर्जा वाढ मिळून ग्रामीण रूग्णालयात रूपांतर झाल्याने या भागातील रूग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळणार असल्याची माहिती आमदार नमिता मुंदडा यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिली आहे.

तालुक्यातील बनसारोळा हे आठवडी बाजार व बाजारपेठ व शिक्षणाची सोय असलेले गाव आहे. त्यामुळे आजूबाजूची दहा-पंधरा पेक्षा अधिक गावे या बाजारपेठेवर अवलंबून असल्याने येथे दररोज वर्दळ असते. त्याबरोबरच येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शंभर-दिडशे रुग्ण दररोज उपचारासाठी येतात. या भागातील वाढती लोकसंख्या व उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोजची रूग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच अपघातातील जखमी व रात्री-अपरात्री उपचारासाठी येर्णाय़ा रूग्णांना अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात जावे लागत होते. बनसारोळा-अंबाजोगाई हे वीस किलोमीटर अंतर असल्याने वेळेत उपचार न मिळाल्याने अनेकांना जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे रूग्णांना वेळेत व चांगल्या आरोग्य सेवा मिळण्यासाठी ग्रामीण रूग्णालय असणे गरजेचे होते.

त्यामुळे आमदार नमिता मुंदडा यांनी बनसारोळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याच्या मागणीसाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यामुळे राज्य शासनाने बनसारोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करण्याचा निर्णय राज्याचे अव्वर सचिव निलम संगवई यांनी अकरा मार्च रोजी काढलेला परिपत्रकाद्वारे घेतला आहे.

लवकरच या ठिकाणी तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे बनसारोळा परिसरातील गावातील रूग्णांना चांगली आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

यापूर्वी दर्जा वाढ मिळून श्रेणीवर्धन करण्यात आलेल्या आडस प्राथमिक केंद्राचे होळ येथे स्थलांतर करण्याचे आदेश आरोग्य विभागाकडून प्राप्त झाल्याने जागेचा शोध सुरू आहे. त्याठिकाणी जागा उपलब्ध होताच स्थलांतर होऊन आडस येथे ग्रामीण रूग्णालय कार्यान्वित होणार आहे.



**बीड : कपिलधारवाडी येथे काल बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांची कीर्तन सेवा संपन्न झाली यावेळी त्यांचा वतीने सत्कार करण्यात आला यावेळी श्रीमंत सव्वाशे, रुद्रा महाकले, नवनाथ शिंदे,बाळू शिंदे,दादा शिंदे, बप्पा शिंदे, कांताराम शिंदे, लक्ष्मण जाधव, वैजिनाथ महाराज शिंदे, अंगात महाराज सातपुते, तुळशीदास शिंदे, योगेश महाराज जोगदंड, शिवाजी महाराज निवडे आदि मान्यवर मंडळी दिसत आहेत. तसेच सप्ताह कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

## कुणबी प्रमाणपत्र न मिळाल्याने मराठा तरुणाची आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पालवण येथील स्वानंद हनुमान मस्के वय २५ वर्षे या मराठा तरुणाने मराठा आरक्षणासाठी आवश्यक असणारी कुणबी नोंद मिळत नसल्याने नैराश्यातून आज दुपारी डोकेवाडा येथील साठवण तलावात उडी मारून आत्महत्या केली. सर्वत्र शोधाशोध केल्यानंतर साठवण तलावात तरुणाने उडी मारल्याची माहिती लक्षात आल्या नंतर नातेवाईक व गावकरी यांनी प्रेत शोधण्यासाठी प्रयत्न केले. अखेर सायंकाळी ६ च्या सुमारास प्रेत बाहेर काढण्यात यश मिळाले. मयताच्या खिशात कुणबी नोंद सापडत नसल्यामुळे जीवन संपवत असल्याची चिठ्ठी आढळून आली. या घटनेमुळे संपूर्ण पालवण गावात शोककळा पसरली.



स्वानंद हनुमान मस्के हा शेतकरी कुटुंबातील मराठा तरुण असून, बी ए शिक्षण झालेले आहे. मोठा भाऊ, एक बहिण, आई वडील असे कुटुंब असून वडील शेती करून उदरनिर्वाह चालवतात. कौटुंबिक आर्थिक परिस्थितीत हलाकीची असल्याने शिक्षणाचा खर्च पेलवत नाही. उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्याने त्यांचे कुटुंब कायम चिंतेत आहे. मराठा आरक्षण मिळावे यासाठी स्वानंद हनुमान मस्के हा नेहमी मराठा आरक्षण लढ्यात सहभागी असायचा. कुणबी प्रमाणपत्र वाटपाचा निर्णय झाला असला तरी, बीड तालुक्यातील पालवण गावात कोणत्याही मस्के मराठा कुटुंबाची कुणबी नोंद प्रशासकीय दस्तऐवजात आढळून आली नाही. स्वानंद मस्के यांनी खूप प्रयत्न करूनही नोंद आढळत नसल्याने हताश झाले. कुटुंबात होणारी भवितव्याची चिंता आणि मार्ग दिसत नसल्याने या तरुणाने आत्महत्या केली असल्याचे समोर आले आहे.

## जिल्ह्यात दुष्काळ जाहीर, मात्र शेतकरी वाऱ्यावरच -भाई घोलप

पाटोदा । प्रतिनिधी

२०२३ च्या खरीप हंगामात पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके वाया गेली. सोयाबीन,तुर,मका,कापुस,मुग,उडीद,कांदा आणि इतर सर्वच पिके जवळपास ८०% उत्पादन कमी झाले आहे. त्यानंतर शासनाने बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला या नंतरच्या काळात सर्वच खरीप पिकाचा किमान ७५% पिकविमा शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असतांना उचल म्हणून २५% अग्रीम विमा बीड जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना मिळाला. शेतकऱ्यांचे लाईटबील संपूर्ण माफ करणे गरजेचे असतांना जिथे विद्युत पंपच चालले नाहीत तिथे शेतकरी लाईट बील कसे भरणार,बँकेकडुन शेतकऱ्याने काढलेले खरीप पीक कर्ज हे पुर्णतः माफ करणे गरजेचे आहे.

किमान पीक कर्जाचे पुनगर्ठन करुन नव्याने पीक कर्ज देणे,नवीन खरीप पिकासाठी गरजेचे आहे.जिल्ह्यात दुष्काळामुळे आज बेरोजगारी जास्त वाढत चालली आहे,त्या कष्टकरी मजुरांना प्रत्येक गावच्या शिवारात किमान १०० मजुरांना रोहयोचे काम मिळेल असे कोणतेही नियोजन जिल्हा प्रशासनाने केलेले नाही.आज काही ठिकाणी जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर असतांना चारा छावण्या नाही तर किमान शेतकऱ्याला गाय,बैल,म्हैस,शेळी,मेंढी यांना जगवण्यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे.



जनतेला पिण्यायोग्य स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे तो त्याचा अधिकार आहे. परंतु या वरील कोणत्याही विषयावर शासन गांभीर्याने घेत नाही.शासनाने दुष्काळ जाहिर करुन ८ महिने झाले तरी त्याची अंमलबजावणी केलीच नसल्यामुळे एकूणच बीड जिल्ह्यातील जनता मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहे याची तात्काळ दखल शासनाने घ्यावी नसता जनतेला बरोबर घेऊन भारतीय शेतकरी कामगार पक्ष तिव्र आंदोलन करण्यात येईल असे लेखी निवेदन शेकापाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांचे मार्फत राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड मा.ना.धनंजयजी मुंडे साहेब यांना पाठविले आहे. माहितीस्तव मा.जिल्हाकिरी,बीड तसेच शेकापचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील यांनी दिले आहे.

# बीडच्या पाणीपुरवठ्यावर शेकडो खर्च मात्र पाणीटंचाई कायम

## नगर परिषदेच्या ढिसाळ नियोजनामुळे नागरिकांची पाण्यासाठी भटकंती : निजाम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे शासनाने अमृत पाणी पुरवठा योजनेंतर्गत शेकडो कोटी रू खर्च करून ही लोकसंख्ये नुसार वॉर्डात समान पाणी वाटप होत नाही. नगर परिषद पाणीपुरवठा डीसाळ नियोजनामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे वार्डामध्ये किमान १५ ते २० दिवसानंतर नळांना पाणी येत असूनदेखील बीड नगरपरिषदेने यासंदर्भात अद्याप पर्यंत कोणतेही ठोस नियोजन केलेले दिसत नाही बीड शहरातील पाणीपुरवठा



विस्कळीत झालेला असून बीड शहरातील नागरिकांकडून दररोज पाणी देण्यात येत असल्याप्रमाणेच पाणी पट्टी वसूल करण्यात येत आहे.

एखाद्या वार्डामध्ये १५ दिवसाला तर अनेक वार्डामध्ये २० ते २५ दिवसाला पाणी करण्यात येत असल्याचे चित्र सध्या दिसत अनेक वॉर्डत पाईप लाईन लिकेज आहे व नगर परिषदेच्या माध्यमातून टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये सुद्धा मोठा गैरव्यवहार होत असून शिफारशीनुसार व तोंड बघून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे यासंदर्भात बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारीनी लक्ष देणे हे अत्यंत आवश्यक आहे व आता काही दिवसानंतर महाराष्ट्रामध्ये मान्सून दाखल होणार असून मागील वेळी थोड्याशा पावसामुळे बीड शहराचे अनेक भागांमध्ये घरामध्ये दुकानांमध्ये पाणी शिरले होते व नाल्यांची साफसफाई न झाल्यामुळे ठिकठिकाणी पाण्याचा योग्य निचरा न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात डबके साचले होते त्यामुळे येणाऱ्या पावसाच्या पूर्वी बीड नगर परिषदेचे मार्फत मानसून पूर्वतयारी चा भाग म्हणून बीड शहरातील छोटे मोठे नाले सरसकट साफसफाई व स्वच्छता मोहीम राबवण्यात नगर परिषदेमार्फत लवकरात लवकर राबवणे अत्यंत आवश्यक आहे व सदरील स्वच्छता अभियानामध्ये स्वच्छते संदर्भात नाले साफसफाई संदर्भात निघणाऱ्या टेंडर मध्ये कोणताही काळाबाजार होणार नाही याची दक्षता घेणे अत्यंत आवश्यक झालेले आहे त्यामुळे स्वच्छता विषयीच्या कामांमध्ये संबंधित कंत्राटदाराला त्याने केलेल्या कामांच्या व्हिडिओ शूटिंग व छायाचित्र झालेले काम मुख्याधिकाऱ्यांनी स्वतः तपासून घ्यावे व होणाऱ्या गैरप्रकार थांबवणे बाबतीत कार्यवाही करण्यात यावी अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनेच यासंदर्भात तीव्र आंदोलन करण्यात येईल असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर प्रमुख शेख निजाम, नगरसेवक शेख अमर, हाफिज अशफाक, खय्युम इनामदार, मोमीन जुबेर,सय्यद फहीम यांनी म्हंटले आहे आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

मंगळवार दि.२१ मे २०२४ | ६



# संभाजीनगरच्या शिंदे गटाच्या आमदारांची धाकधूक वाढली

## संदिपान भुमरे पडल्यास उमेदवारीचा होणार विचार

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

छ. संभाजीनगर लोकसभा मतदारसंघासाठी भाजप आग्रही असताना शिंदेंनी आपली पूर्ण शक्ती पणाला लावून ही जागा आपल्याकडे खेचून घेतली. महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे यांना निवडून आणण्याची जबाबदारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रामुख्याने आपल्या पक्षाच्या आमदारांवर टाकली होती. एवढेच नाही, तर लोकसभेत संदिपान भुमरे यांना विधानसभा मतदारसंघातून लीड मिळाली नाही, तर विधानसभेला उमेदवारी देताना याचा निश्चित विचार केला जाईल, असा इशाराही दिला होता.





दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडली. यामध्ये मराठवाड्याची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याने एकनाथ शिंदेंना भक्कम साथ दिली. जिल्ह्यातील सहापैकी पाच आमदारांनी शिंदेंसोबत जाण्याचा निर्णय घेतला. याचे बक्षीस राज्यातील सत्तांतरानंतर संदिपान भुमरे, अब्दुल सत्तार यांना कॅबिनेट मंत्रिपदाच्या स्वरूपात देण्यात आले. एवढेच नाही तर जिल्ह्यात महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि भाजप या दोन पक्षांचे आमदार, मंत्री आहेत. पैकी लोकसभेचे उमेदवार असलेले संदिपान भुमरे, अल्पसंख्याक व पणन मंत्री अब्दुल सत्तार यांचे विधानसभा मतदारसंघ लोकसभेला जालन्यात येतात. त्यामुळे या दोघांच्या कामाचे मूल्यमापन रावसाहेब दानवे यांच्या निकालानंतर केले जाईल. संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातील शहरी भागात पूर्व-पश्चिम आणि मध्य असे तीन विधानसभा मतदारसंघ येतात. पैकी पूर्वचे आमदार राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे हे आहेत. तर पश्चिमचे संजय शिरसाट, मध्यचे प्रदीप जैस्वाल हे शिंदे सेनेचे आमदार आहेत. ६३ टक्के मतदान झाल्याची नोंद समोर आल्यानंतर शहरातील पूर्व-पश्चिम आणि मध्य या तीनही मतदारसंघात ६० ते ६२ टक्के एवढ्या मतदानाची नोंद झाली आहे. तर ग्रामीणमधील कन्नड, वैजापूर- गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघात सरासरी ६१ टक्के मतांची नोंद झाली आहे. संदिपान भुमरे यांना यापैकी कोणाच्या मतदारसंघातून सर्वाधिक मतदान होते आणि कोणाच्या कमी याचे मूल्यमापन चार जूनच्या निकालानंतर होणार आहे.ज्याच्या मतदारसंघातून लोकसभेला लीड त्यालाच विधानसभेला लिफ्ट, असे धोरण मुख्यमंत्र्यांनी ठरवले आहे. त्यामुळे आता निकाल लागेपर्यंत या सगळ्या आमदारांची धाकधूक कायम राहणार आहे.

# खर्गेंच्या पोस्टरवरील शाईफेक प्रकरण काँग्रेस कार्यकर्त्यांना भोवणार

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याविषयी समाजमाध्यमांवर चुकीच्या पोस्ट टाकून त्यांच्या पोस्टरवर शाईफेक करणाऱ्या पश्चिम बंगालमधील काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर शिस्तभंगाची कठोर कारवाई केली जाणार आहे. याप्रकरणी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीकडे तातडीने अहवाल पाठविण्याचे निर्देश पक्षश्रेष्ठींनी पश्चिम बंगाल काँग्रेसच्या प्रभारींना दिले आहेत.



तृणमूल काँग्रेससोबत आघाडी करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार हायकमांडकडे असून अधीररंजन चौधरी यांच्याकडे नाहीत, असे विधान काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी मुंबईत केले होते. त्यानंतर पश्चिम बंगालच्या काही काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खर्गे यांच्याविषयी समाजमाध्यमांवर पोस्ट टाकल्या होत्या. पश्चिम बंगाल प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयाबाहेर लावलेल्या पोस्टरवर शाईफेक केली होती. या प्रकाराची काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी गंभीर दखल घेतली आहे. पश्चिम बंगालच्या काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केलेल्या पक्षविरोधी कृत्याची आम्ही गंभीर दखल घेतली असल्याची माहिती काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणूगोपाल यांनी दिली आहे. या घटनेचा अहवाल तातडीने अखिल भारतीय काँग्रेसला पाठविण्याचे निर्देश पश्चिम बंगाल काँग्रेसच्या प्रभारींना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणावर अधीररंजन चौधरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून याबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची सूचना कार्यकर्त्यांना केली आहे. शाई फेकण्यात आलेले खर्गे यांचे पोस्टर्स हटवून संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वणी येथे मतदान प्रक्रिया बंद ठेवून सर्व कर्मचारी बसले जेवायला

**वणी । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी शहरात चांगला प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान, वणी येथील हायस्कूलमधील मतदान केंद्रात मतदारांच्या रांगा लागल्या असताना कर्मचारी मतदान थांबवून सर्वजण एकत्र जेवायला बसल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे मतदारांना २० मिनिटे रांगेत तिष्ठत बसावे लागले.

वणी येथील हायस्कूलमध्ये दिंडोरी लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी १०५, १०६, १०७, १११, ११२ अशी मतदान केंद्र होती. दुपारी एकच्या दरम्यान मतदान केंद्र १०७ मध्ये मतदानासाठी मतदारांची मोठी रांग लागलेली होती. तर दुसरीकडे केंद्रातील कर्मचारी मतदान प्रक्रिया थांबवून सर्व जण एकत्र जेवायला बसले होते. त्यामुळे मतदारांना २० मिनिटे प्रतीक्षा करावी लागली. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी फोटो काढले असता तेथील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अटकाव करण्याचा प्रयत्न केला. एक महिला कर्मचारी खुर्चीवर बसलेल्या होत्या. परंतु, त्या एकट्या मतदान प्रक्रिया राबवू शकत नसल्याने त्याही इतर कर्मचाऱ्यांची वाट पाहत बसल्या होत्या.

# प्रियंका गांधी-वाड्रा यांच्या सभांचा धडाका

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीचे पाच टप्पे पूर्ण झाले आहेत. आता आणखी २ टप्पे बाकी आहेत. पुढील दोन टप्प्यांत ११४ जागांवर निवडणूक होणार आहे. त्यामुळे पुढील टप्पेही महत्त्वाचे आहेत. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांना प्रचार सभांसाठी मागणी वाढली आहे. पुढील दोन टप्प्यांवर काँग्रेसने आता लक्ष केंद्रीत केले असून, प्रियंका गांधी यांच्या पुढील सभांचे नियोजन करण्यात येत आहे. काँग्रेसमधील सर्वच स्टार प्रचारक त्यासाठी कामाला लागले आहेत.



## पुढील दोन टप्प्यांवर आता काँग्रेसचे लक्ष

स्टार प्रचारक म्हणून पक्षाच्या सरचिटणीस प्रियंका गांधी वाड्रा यांच्या निवडणूक सभा घेण्यासाठी काँग्रेसच्या उमेदवारांकडून मागणी वाढली आहे. त्यांना पंजाब, हिमाचल प्रदेशातून आग्रह धरला जात आहे. पाचव्या टप्प्यात अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणा-या रायबरेली-अमेठी लोकसभा मतदारसंघातील निवडणूक पार पडली आहे. त्यामुळे आता पुढील दोन टप्प्यांतील उमेदवारांच्या प्रचाराकडे लक्ष केंद्रीत केले आहे.

इंडिया आघाडीकडून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्यानंतर प्रियंका गांधी, सचिन पायलट यांना पक्षाच्या उमेदवारांमध्ये निवडणूक सभांना सर्वाधिक मागणी आहे. प्रियंका गांधी पाचव्या टप्प्यातील मतदानापर्यंत रायबरेलीत थांबल्या होत्या.

आज मतदान पार पडले. त्यामुळे आता त्या काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी पुन्हा सक्रीय झाल्या. पंजाबमध्ये बहुरंगी लढती होत आहेत. त्यामुळे पंजाबमध्ये चांगली कामगिरी करण्याचे काँग्रेससमोर आव्हान आहे. त्याचवेळी, हिमाचल प्रदेशात राज्यसभा निवडणुकीत अभिषेक सिंघवी यांचा अनपेक्षित पराभव झाला. त्यामुळे राज्यातील काँग्रेस सरकारचे आव्हान वाढले असून लोकसभेसह सहा विधानसभा जागांवर होत असलेल्या पोटनिवडणुका अत्यंत महत्त्वाच्या आहेत. प्रियंका गांधी यांचे हिमाचल प्रदेशावरही विशेष लक्ष आहे.

### ११४ जागांवर मतदान बाकी

**सहाव्या टप्प्यातील मतदान २६ मे रोजी आणि सातव्या टप्प्यातील मतदान १ जून रोजी होणार असून प्रचाराचा शेवटचा दिवस ३० मे आहे. त्यामुळे प्रचारसभांसाठी रणनिती आखली जात आहे. या दोन टप्प्यांत ११४ जागांवर मतदान होणार आहे. त्यामुळे पुढील दोन टप्पेदेखील तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यामुळे काँग्रेस पक्षाने आता पुढील रणनिती आखायला सुरुवात केली आहे.**

# कर्नाटक विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १३ जून रोजी मतदान



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

कर्नाटक विधानपरिषदेच्या ११ जागांवरील १३ जून रोजी होऊ घातलेल्या निवडणुकीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी जाहीर केला.

कर्नाटक विधानपरिषदेतील अरविंद कुमार अरळी, एन.एस. बोसेराजू, के. गोविंदराज, डॉ. तेजस्विनी गौडा, मुनिराजू गौडा, के.पी. नानजुंडी विश्वकर्मा, बी. मी फारुख, रघुनाथराव मलकापुरे, एन. रवी कुमार, एस. राद्रगौडा, के हरीश कुमार या ११ सदस्यांचा कार्यकाळ १७ मे २०२४ संपल्यामुळे या जागा रिक्त आहेत. त्या भरण्यासाठी निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केला. निवडणूक आयोगाच्या घोषणेनुसार, २७ मे रोजी अधिसूचना जारी होणार आहे. त्यानंतर उमेदवारांनी निवडणूक अर्ज भरण्याची शेवटची तारीख ३ जून असेल, तर १३ जून रोजी मतदान होऊन त्याचदिवशी मतमोजणी होणार आहे.

# नाशिकमध्ये बोगस मतदान?

## महाविकास आघाडीच्या आरोपाने खळबळ

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा मतदारसंघात सोमवारी मतदानाची प्रक्रिया पार पडली. नाशिकमधील अनेक मतदान केंद्रांवर बोगस मतदान केल्याचा धक्कादायक आरोप महाविकास आघाडीकडून करण्यात आला आहे. यामुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

नाशिक लोकसभा मतदारसंघासाठी महायुतीतून शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे, महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे उमेदवार राजाभाऊ वाजे, अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांच्यात तिरंगी लढत होत आहे. या लढतीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीकडून आरोप आणि प्रत्यारोपांच्या फैरी सुरु आहेत. अनेक मतदान केंद्रांवर बोगस वोटिंगच्या घटना घडल्या. नाशिकच्या रायगड चौक परिसरात मतदान केंद्रावर बोगस वोटिंग झाल्याचा आरोप, महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. तसेच कार्यकर्ते आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांमध्ये अनेक ठिकाणी बाचावाची झाल्याचे दिसून आले आहे. तर काही ठिकाणी मतदार यादीतून मतदारांचे नावे गायब झाल्याने मतदारांनी संताप व्यक्त केला. सिडको परिसरातील मतदान केंद्रावर महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून गोंधळ घातल्याचा प्रकार समोर आला. मतदान केंद्रात जेवणाचे डबे घेऊन जाण्यावरून महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांसोबत हुज्जत घातली. यामुळे सिडकोतील मतदान केंद्रावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर गोंधळ घालणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

# भिवंडीत बोगस मतदानाचा सुळसुळाट भाजप उमेदवाराचा खळबळजनक आरोप

**भिवंडी । प्रतिनिधी**

शहरामध्ये सकाळपासून शांततेत सुरू असलेल्या मतदानात सायंकाळी काही ठिकाणी वादंग होत गालबोट लागले. खंडूपाडा बाला कंपाऊंड मिलत नगर येथील अल्पसंख्यांक बहुल असलेल्या या मतदान केंद्रावर बोगस मतदान होत असल्याच्या आरोप करण्यात आला. परिणामी, भाजप उमेदवार कपिल पाटील यांच्याकडे या संबंधित तक्रार गेल्यानंतर त्यांनी स्वतः या मतदान केंद्राला भेट दिली. त्यानंतर संतप्त कपिल पाटील यांनी निवडणूक अधिकारी तसेच उपस्थित पोलिसांना धारेवर धरत एकच गोंधळ घातला. यावेळी मतदान केंद्र परिसरात उभे असलेल्या नागरिकांच्या घोळक्याला बाहेर हाकलून लावण्याची मागणीही त्यांनी केली आणि मग स्वत:च पुढाकार घेत या मतदान केंद्रावरील गर्दी बाजूला केली.

परिसरातील अनेक मतदान केंद्रावर बोगस मतदान होत असल्याच्या तक्रारी यावेळी कपिल पाटील यांनी केल्या. तसेच काही ठिकाणी बोटावरील शाई पुसण्यासाठी केमिकल घेऊन बसल्याचे देखील दिसून आल्याचा आरोप पाटील यांनी केला. लोकशाही वाचवायला निघालेलेच लोकशाहीची हत्या करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. संबंधित प्रशासनाने वेळीच याची दखल घेऊन कारवाई करावी, अशी मागणीही भाजप उमेदवार कपिल पाटील यांनी यावेळी केली. तर दुसरीकडे भिवंडी लोकसभेसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार असलेले सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी हे सर्व आरोप फेटाळले असून, आपला पराभव दिसत असल्याने कपिल पाटील असे प्रकार करत असल्याचे मत सुरेश म्हात्रे यांनी व्यक्त केले. सकाळपासून मतदारांनी मतदानासाठी दाखवलेला उत्साह ही विजयाची नांदी असून कपिल पाटील यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, असे ते म्हणाले. त्यांनी आपला पराभव मान्य केला आहे. त्यामुळे त्याचे खोटे आरोप करून मतदान जाणून-बुजून बंद पाडण्याचा प्रयत्न ते करत असल्याचे सुरेश म्हात्रे म्हणाले. ज्यांनी आयुष्यभर सर्वसामान्यांना धमकावलं त्यांनीच खऱ्या अर्थाने लोकशाहीची हत्या केली असून आम्ही संविधान वाचवण्यासाठी लढत असल्याचा प्रत्युत्तर महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश बाळ्या मामा म्हात्रे यांनी दिले आहे.

# आष्टीतून पंकजाताईंना ३० हजाराचे मताधिक्य मिळणार

## आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे, माजी आ.भीमराव धोंडे यांची मेहनत कामी येणार



**आष्टी । शरद रेडेकर**

अवघ्या महाराष्ट्रामध्ये हाय व्होल्टेज लोकसभा मतदारसंघ म्हणून बीड जिल्ह्यातले पाहिले जात होते या निवडणुकीच्या बाबतीत बोलायचे झाले तर एका बाजूला जनतेने हाती घेतलेली निवडणूक असे एकंदरीत वातावरण पहिल्या टप्प्यात दिसून येत होते मात्र दुसऱ्या टप्प्यात या वातावरणाला वेगळेच वळण मिळून ही निवडणूक जातीकडे झुकली गेली आष्टी मतदार संघामध्ये विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे विधान परिषदेचे आमदार सुरेश आण्णा धस व शिक्षण महर्षी माजी आमदार भीमराव धोंडे हे भाजपाचे उमेदवार पंकजा मुंडे यांच्या बाजूने भक्कमपणे उभी होती तर इंडिया आघाडीचे शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे हे उमेदवार होते या दोघांमध्ये ही निवडणूक काट्याची झाली या निवडणुकीमध्ये मराठा आरक्षणाचा प्रश्न मनोज जरांगेने उभारलेले आंदोलन व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अंबाजोगाई येथे घेतलेल्या जाहीर सभेमध्ये मुस्लिम समाजाविषयी केलेले वक्तव्य हे दोन्ही मुद्दे या निवडणुकीमध्ये चांगले चर्चिले गेले व ही निवडणूक अगदी चुरशीची होत गेली. आष्टी मतदार संघाच्या बाबतीत बोलायचे झाले तर आष्टी मतदार संघामध्ये विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे विधान परिषदेचे आमदार सुरेश आण्णा धस व भीमरावजी धोंडे येथे तिघेही एकत्र असले तरी मात्र जनतेने हातात घेतलेली निवडणूक तर मराठा समाजाच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर बजरंग सोनवणे यांना मतदान झाल्याचे बोलले जात आहे.तर ओबीसी मतदानाचा







पान ३ वर

# ..तर दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देऊ - अरविंद केजरीवाल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

आम आदमी पक्षाला मते दिल्यास आम्ही दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देऊ, असे आश्वासन दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सोमवारी (दि.२०) जनतेला दिले. दिल्लीतील कायदा व सुव्यवस्था सुधारली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



राजधानी दिल्लीत २५ मे रोजी होऊ घातलेल्या मतदानासाठी जोरात प्रचार सुरू आहे. केजरीवाल यांनी दक्षिण दिल्लीतील 'आप'चे उमेदवार साहीराम पहलवान यांच्या प्रचारासाठी 'रोड शो' केला. गाडीचे 'सन रूफ' उघडून त्यांनी जनतेला संबोधित केले. केजरीवाल म्हणाले की, केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होणार असल्यामुळे भाजप आणि पंतप्रधान मोदी गोंधळले आहेत. या सरकारमध्ये आपचा सहभाग राहणार आहे. आमचे सरकार आल्यास दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देणार आहोत. दिल्लीची कायदा व सुव्यवस्था सुधारून दिल्लीचे जनतेसाठी काम करणारे उपराज्यपाल आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार दि.२१ मे २०२४ | पान ७

# पुण्यात पुढील चार दिवस पावसाची बॅटिंग, भारतीय हवामान विभागाकडून अपडेट

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाकडून पुण्यात २४ मे पर्यंत हलक्या ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. या काळात वादळी वाऱ्यासह पाऊस पडेलस इसा इशारा देखील हवामान विभागानं दिला आहे. पुण्यातील इंदापूर तालुक्यातील गावांमध्ये पावसानं काल हजेरी लावली होती.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुणे शहरात दिवसाचं तापमान ३८ ते ३९ अंश सेल्सिअसपर्यंत जाऊ शकतं. हे तापमान पुढील काही दिवस कायम असेल. पुणे शहरात शिवाजीनगर आणि लोहेगावमध्ये गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसानं हजेरी लावलेली होती. रविवारी मात्र पावसानं हजेरी लावली नव्हती.



हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार मध्य महाराष्ट्रात आणि पुणे जिल्ह्यात चक्रीवादळाच्या अभिसरणाची स्थिती निर्माण झाली आहे. दुपारपर्यंत तापमानात वाढ जाणवेल, असं देखील सांगण्यात आलं आहे. या स्थितीमुळं वातावरणातील आर्द्रता वाढू शकते. वातावरणातील या बदलांमुळं शहरातील काही भागात सायंकाळच्या वेळी वादळी वाऱ्यासह, विजांच्या कडकडाटात पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे, असं सांगण्यात आलं आहे.

पुण्यामध्ये अशा प्रकारच्या वातावरणाची स्थिती पुढील काही दिवस असेल, असं हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे. पुणे शहरासह जिल्ह्यातील काही भागांमध्ये या काळात ४० ते ५० कि.मी. प्रति तास या वेगानं वारे वाहू शकतात, असा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे.

दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांच्यावतीनं नैऋत्य मोसमी वाऱ्याचं आगमन दक्षिण निकोबार बेटावर आणि दक्षिण अंदमान सागरात झाल्याच सांगितलं. याशिवाय मान्सून मालदीव, कोमोरिन भाग, आणि बंगालच्या खाडीच्या दक्षिणेकडील भागात झाल्याचं सांगितलं.


भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार मान्सून केरळमध्ये ३१ मे पर्यंत पोहोचेल. भारतीय हवामान विभागानं यंदा सामान्य म्हणजेच सरासरीच्या १०६ टक्के पावसाची शक्यता वर्तवली आहे.

भारतात गेल्यावर्षी मान्सूनचं आगमन उशिरानं झालं होतं. ८ जूनला मान्सून केरळमध्ये पोहोचला होता.

दरम्यान, इंदापूर तालुक्यात पुन्हा एकदा अवकाळी वादळाचा तडाखा बसला आहे. इंदापूर तालुक्यातील कचरवाडी भागात अवकाळी वादळांने घराचे जनावरांच्या गोठ्याचे पत्रे उडाले. लिंबाची मोठी झाडे देखील कोसळली. काही ठिकाणी विजेचे खांब देखील वाकले झाले असून विड्याच्या पानांच्या शेतीचंही मोठं नुकसान झालं आहे.

मागील दोन ते तीन दिवस राज्यभरातील विविध भागात अवकाळी पाऊस सुरू आहे. कोकणातील देखील अनेक ठिकाणी चक्रीवादळ आणि पाऊस पडण्याचे प्रकार सुरू आहेत.यात आता चिपळूण मधील सह्याद्री भागात झालेल्या ढगफुटी सदृश्य पाऊस पडला. अर्धा तास मुसळधार पडलेल्या पावसाने अडरे, अनारी परिसरातल्या नद्या प्रवाहित झाल्या.

## कापूरहोळ येथे हॉटेल मालकामुळे दुर्घटना टळली



भोर : : कापूरहोळ (ता. भोर) च्या चौकातील आनंद हॉटेललगत असणार्या शेडवर संबंधित व्यावसायिकाचा डिजिटल बोर्ड वादळी वार्याने पडणार असल्याचे लक्षात येताच हॉटेलमालकांनी प्रसंगावधान ओळखून ग्राहकांना सुरक्षित ठिकाणी घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. रविवारी (दि. १९) सायंकाळी पुणे-सातारा महामार्ग पट्ट्यात वादळी वार्यासह पावसाने धुमाकूळ घातला. दरम्यान कापूरहोळ (ता. भोर) येथील आनंद हॉटेलशेजारी असणार्या त्यांच्या दुकानावरील फलक वार्याच्या झोतात पडणार असल्याचे लक्षात येताच तेथील ग्राहकांना हॉटेलचे मालक आनंद दळवी व लखन दळवी यांनी आनंद हॉटेलमध्ये घेतले.

घोंगावता जोरदार वार्यात थोड्याच वेळात त्यांच्या दुकानाच्या वरील असणारे डिजिटल बोर्ड धीम्यागतीने कोसळले, यामुळे मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, दळवी बंधूंनी वेल्डरच्या माध्यमातून तातडीने कटिंग करून फलक बाजूला घेतल्याने सेवा रस्त्यावर वाहतूक कोंडी देखील झाली नाही.

# वागजवाडीला तीन दिवसांआड पाणी; पाणी विकत घेण्याची वेळ

**भोर | प्रतिनिधी**

पावसाचे आगार म्हणून ओळखल्या जाणार्या भोर तालुक्यालाही यंदा भीषण दुष्काळाची झळ बसली आहे. तालुक्यातील वागजवाडी, राऊतवाडीला पाणीटंचाईचा मुकाबला करावा लागत आहे. भरपूर पाऊस पडत असलेल्या या भागातील ग्रामस्थांवर पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. गावाला पाणीपुरवठा करणार्या विहिरीचे पाणी कमी झाल्याने तीन दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे.

भूगर्भातील पाणी कमी झाल्याने या भागातील विहिरी आटल्या आहेत. गावकीच्या विहिरीतून दर तीन दिवसांनी पिण्याचे पाणी मिळत आहे. ज्यांच्याकडे पैसे आहेत ते ५० रुपयांना एक बॅरल दुसर्या गावातून



आणत आहेत. ज्यांच्याकडे पैसे नाहीत ते शिवारातील विहिरीवरून पाणी आणत आहेत. जनावरांसाठी पाणी विकत आणावे लागत आहे. दूरवर नेऊन त्यांची तहान भागवावी लागत आहे. प्रशासनाच्या उदासीनतेबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. वागजवाडी आणि राऊतवाडीमध्ये तीन दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. नागरिकांना अल्प पाणी मिळत असल्याने खासगी टँकरचे पाणी विकत घ्यावे लागत आहे, असे सुधीर कारळे यांनी सांगितले. येथे पिण्यासाठीच पाणी नाही, तर घर कसे बांधू? असा सवाल करीत स्वतःचे घराचे काम बंद ठेवल्याचे दिलीप मोरे यांनी सांगितले. संभाजी राऊत, शशिकला राऊत आदींनी पाण्याच्या तुटवड्याबाबत नाराजी व्यक्त केली.

# महापालिकेच्या वतीने ५ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई

पिंपरी, दि. २० मे २०२४ - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अनधिकृत जाहिरात फलक निष्कासनाची कारवाई आजपासून सुरू करण्यात आली असून 'इ' क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील एकूण ५ अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. तसेच येत्या तीन दिवसांत शहरातील उर्वरित अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने शहरातील जाहिरात फलकांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणामध्ये आतापर्यंत अ (३), ब (५), क (३), ड (२), इ (५), फ (६) असे मिळून क्षेत्रिय कार्यालयांतर्गत एकूण २४



अनधिकृत फलक आढळले असून वाढीव ३२१ जाहिरात फलक आढळले आहेत.

पिंपरी चिंचवड शहरातील होर्डिंग्सबाबत महापालिका अधिकारी, जाहिरात फलक धारक यांच्यासमवेत शुक्रवार १७ मे रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत आयुक्त शेखर सिंह यांनी फलकधारकांना अनधिकृत जाहिरात फलक दोन दिवसात हटविण्याबाबत तसेच अधिकाऱ्यांना पुढील कारवाई करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अनधिकृत फलकांवर निष्कासनाची कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या, या कारवाईस आजपासून सुरूवात झाली.

३०२० चे २ फलक ४०२० चे २ फलक १५२० चा १ फलक असे एकूण ५ फलक आजच्या कारवाईत निष्कासित करण्यात आले. या कारवाई दरम्यान सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उप आयुक्त संदीप खोत, कार्यालय अधिक्षक ग्यानचंद भाट, परवाना निरीक्षक, मजूर, एमएसएफ जवान तसेच महापालिका सुरक्षा रक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

### २ कनिष्ठ संरचना अभियंत्यांची करण्यात येणार नेमणूक

शहर अभियंता कार्यालयामार्फत स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेटचा नमुना तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच फलक उभारण्यात आलेल्या जागेवर पाहणी करण्यासाठी २ कनिष्ठ संरचना अभियंत्यांची नेमणूक महापालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. यामुळे जाहिरात फलकाच्या संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासही मदत होणार आहे.

### ३१ मे २०२४ पर्यंत होर्डिंग्स परवानाचे नूतनीकरण करावे अन्यथा कारवाई

२०२४-२५ साठी होर्डिंग्स परवाना नूतनीकरण ३१ मे २०२४ पर्यंत करावे अन्यथा सदरचे होर्डिंग्स अनधिकृत समजून निष्कासनाची कारवाई करण्यात येईल अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

### क्षेत्रीय अधिकाऱ्यांना फेरपडताळणीबाबत सूचना

आज सकाळी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आकाशचिन्ह परवाना विभाग, शहर अभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्यासमवेत बैठक झाली. त्यावेळी त्यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी बुधवारपर्यंत आपआपल्या प्रभागातील अनधिकृत होर्डिंग्सचे सर्वेक्षण करण्याच्या व फेरपडताळणी करण्याच्या सूचना दिल्या.

# पशुधनाच्या ईअर टॅगिंगची काटेकोर अंमलबजावणी करा : डॉ. दिवसे यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

नॅशनल डिजिटल लाइव्हस्टॉक मिशन (एनडीएलएम) अंतर्गत 'भारत पशुधन प्रणाली' मध्ये ईअर टॅगिंग केलेल्या सर्व पशुधनाच्या सर्वंकष नोंदी घेण्यात येत असून शेतकर्यांनी आपल्या पशुधनाचे ईअर टॅगिंग करून घेणे बंधनकारक असल्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयाची सर्व संबंधित विभागांनी काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत.

केंद्र शासनाच्या भारत पशुधन प्रणालीमध्ये ईअर टॅगिंग (१२ अंकी बार कोडेड) केलेल्या सर्व पशुधनाच्या सर्वंकष नोंदी घेण्यात येत आहेत. यामध्ये जन्म-मृत्यू नोंदणी, प्रतिबंधात्मक लसीकरण व औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण यांचा समावेश आहे. या प्रणालीवर संबंधित पशुधनाची प्रजनन, आरोग्य, मालकी हक्क, जन्म-मृत्यू आदी सर्व माहिती उपलब्ध झाली आहे.

राज्यातील सर्व पशुधनाची सर्वंकष माहिती एका ठिकाणी उपलब्ध होऊन सांसर्गिक रोगांना प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी, तसेच प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, तसेच पशू व पशुजन्य उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थामार्फत पशूधनास कानात टॅग (बिल्ला) लावून त्याची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी करणे आवश्यक आहे.



त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्था यांना विविध निर्देश दिले आहेत. त्यानुसार १ जूननंतर ईअर टॅगिंगशिवाय पशुधनास पशुवैद्यकीय संस्था, दवाखान्यामधून कोणतीही पशुवैद्यकीय सेवा देण्यात येऊ नये. आपल्या अधिनस्त असलेल्या कत्तलखान्यामध्ये टॅग असल्याशिवाय म्हैसवर्गीय जनावरांची कत्तल करण्यास परवानगी देण्यात येऊ नये. सर्व महसूल, वन, वीज व महावितरण विभाग यांनी नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का तसेच वन्य पशुच्या हल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास ईअर टॅगिंग केलेली नसल्यास नुकसानभरपाईची रक्कम देण्यात येऊ नये. कोणत्याही पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंग असल्याशिवाय करता येणार नाही. तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदार यांच्यावर योग्य कायदेशीर, दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

१ जूनपासून ईअर टॅग नसलेल्या पशुधनाची, बाजार समित्या, आठवडी बाजार व गावागावातील खरेदी- विक्री व बैलगाडा शर्यत आयोजन करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. त्यामुळे टॅग नसलेल्या पशुधनास बाजार समितीमध्ये प्रवेश देण्यात येऊ नये व त्यांची खरेदी-विक्री होणार नाही, याची दक्षता संबंधित बाजार समितीने घ्यावी. तसेच ग्रामपंचायत, महसूल विभाग, गृह विभाग यांनी टॅग नसलेल्या बैलांना बैलगाडा शर्यतीमध्ये सहभाग घेण्यास परवानगी देऊ नये.पशुधनाच्या मालकी हस्तांतरणाबाबतच्या नोंदी संबंधित पशुवैद्यकीय अधिकार्याकडून त्वरित अद्ययावत करून घेण्याची जबाबदारी संबंधित पशुपालकाची राहील. ग्रामपंचायतीमध्ये पशुच्या विक्री किंवा परिवर्तनाचा दाखला देताना पशुधनाची ईअर टॅगिंग झाल्याशिवाय तो देण्यात येऊ नये. दाखल्यावर ईअर टॅगचा क्रमांक नमूद करण्यात यावा, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## हॉटेलमध्ये आग लागून सिलिंडरचा स्फोट

हॉटेलच्या किचनमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागली. यात एका सिलिंडरचा स्फोट झाला. महापालिकेच्या तीन अग्निशामक बंबांच्या साह्याने जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले. पिंपळे सौदागर येथे स्वराज्य गार्डन हॉटेलमध्ये सोमवारी (दि. २०) दुपारी साडेबाराच्या सुमारास ही घटना घडली.

अग्निशामक दलाकडून मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळे सौदागर येथील स्वराज्य गार्डन हॉटेलमध्ये आग लागल्याची माहिती मिळाली. त्यानुसार महापालिकेच्या मुख्य अग्निशामक केंद्राचे तसेच रहाटणी उप केंद्राचे बंब घटनास्थळी दाखल झाले. हॉटेलच्या किचनमध्ये शॉर्टसर्किट होऊन आग लागली होती. अग्निशामक दलाच्या जवानांनी तीन बंबांच्या साहाय्याने एक तासात आगीवर नियंत्रण मिळवले. आगीत एक सिलिंडरचा स्फोट झाला. तसेच जवानांनी तीन सिलेंडर सुरक्षितपणे बाहेर काढले. यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र, हॉटेलमधील साहित्याचे नुकसान झाले.

महापालिकेच्या अग्निशामक दलाचे विनायक नाळे, सारंग मंगरूळकर, किरण निकाळजे, रुपेश जाधव, विशाल बाणेकर, कैलास वाघिरे, भूषण येवले, सिद्धेश दरवेश, संदीप डांगे, समीर पोटे, अश्विन पाटील, अक्षय झुरे, प्रतीक खांडगे, ओंकार रसाळ, संकेत घोगरे, सौरभ पारखी यांच्या पथकाने आगीवर नियंत्रण मिळवले.

# सामाजिक बांधिलकीतून दिव्यांगांना कलाशिक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

एमआयटी आर्ट डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे स्कुल ऑफ फाइन व अप्लाइड आर्ट्स (सोफा), राष्ट्रीय सेवा योजना(एनएसएस), विद्यार्थी कल्याण विभाग आणि स्कुल ऑफ होलेस्टिक डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमानेअनिकेत सेवाभावी संस्था, पुणे येथे 'कला शिक्षणाद्वारे शैक्षणिक परिवर्तन' या चार दिवसीय स्तुत्य उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

प्रा. शीलकुमार कुंभार आणि प्रा. उत्तम जनवाडे यांच्या मार्गदर्शनातंर्गत या उपक्रमात एमआयटी सोफाच्या विद्यार्थ्यांसह अनिकेत सेवाभावी संस्थेतील ५५ विशेष दिव्यांग मुलांचाही उत्साहपूर्ण सहभाग दिसून आला, याद्वारेत्यांनी संस्थेच्या आवारात जीवंत भित्तीचित्रे तयार करण्यासाठी एकत्रितपणे काम केले. या





उपक्रमाचा उद्देश अनिकेत सेवाभावी संस्थेचे सुशोभिकरण करणे, तसेच या भित्तीचित्रांच्या माध्यमातून एक चांगला संदेश देण्याचा होता. या उपक्रमानेकेवळ कलात्मक अभिव्यक्तीसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले नाही तर दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक एकात्मता आणि सक्षमीकरणाचे महत्व देखील अधोरेखित केले.

एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष आणि कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी अनिकेत सेवाभावी संस्थेच्या उपक्रमाच्या व्यापक परिणामांवर भाष्य केले आणि विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या प्रयत्नांचे देखील कौतुक केले. याप्रसंगी बोलताना, एमआयटी सोफाचे प्राचार्य व अधिष्ठाता डॉ. मिलिंद ढोबळे म्हणाले की, हा उपक्रम कलेच्या पलीकडे जावून प्रत्येक व्यक्तीच्या अद्वितीय क्षमतांना समजून घेवून जोडण्याचे काम करतो. समाजबांधीलकीजपत आमचे विद्यार्थी करत असलेले कार्य निश्चितचा आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. उपक्रमा दरम्यान उपस्थित विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुराज भोयर यांनी विद्यार्थ्यांनी दाखवलेली सामाजिक बांधिलकी, अनिकेत सेवाभावी संस्थेच्या मुलांसोबत वाटून घेतलेला आनंदाचा अनुभव किती हृदयस्पर्शी होता तेअधोरेखित केली.

### सहानुभूती व परस्पर आदराचा संगम

अनिकेत सेवाभावी संस्थेच्या भिंतींना सजवणारी भित्तीचित्रे एकता, सर्जनशीलता आणि कलेच्या परिवर्तनीय शक्तीचे प्रतीक आहेत. एमआयटी-सोफा मधील सहभागी विद्यार्थी आणि अनिकेत सेवाभावी संस्थेच्या मुलांनी केवळ कलाच निर्माण केली नाही तर त्यांनी सहानुभूती आणि परस्पर आदराचा संगम घडवून आणला आहे. या यशस्वी उपक्रमाला अनिकेत संस्थेच्या संचालिका कल्पना वर्पे आणि ट्रस्टी राजश्री जंगले, सुहास जंगले, गणेश तनपुरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# पवना धरणात अवघा २८ टक्के पाणीसाठा उपलब्ध

**पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी**

शहराला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मागील साडेचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहराची सध्याची सुमारे ३० लाख लोकसंख्या आणि भविष्यातील ३० वर्षातील लोकसंख्या वाढीचा विचारात घेऊन पालिकेने आंद्रातून शंभर एमएलडी व भामा आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी आणण्यात येत आहे. त्या पाण्यावरील प्रक्रियेसाठी चिखलीत जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. आंद्रा धरणातून केवळ ५० एमएलडी पाणी निघोजे येथील बंधाऱ्यातून पाणी उचलून समाविष्ट भागातील नागरिकांना देण्यात येत आहे. परंतु, वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत असून, तक्रारींमध्ये वाढ होत आहे.

तसेच पवना धरणात सध्या २८ टक्के पाणीसाठा असून हा साठा जून अखेरपर्यंत पुरेल एवढा आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेला ३०.९२ टक्के पाणीसाठा होता. मागील वर्षीपेक्षा दोन टक्क्यांनी पाणीसाठा कमी आहे. दरम्यान, पवना आणि आंद्रा धरणातील पाणी जूनअखेर पुरेल एवढा उपलब्ध आहे. पण, जूननंतर पावसाने ओढ दिल्यास शहरावर पाणी कपातीचे संकट येणार आहे. त्यावेळेस निश्चितपणे पाणी कपात करावी लागेल. तसेच शहरातील अनेक गृहनिर्माण संस्थांना टँकरद्वारे पाणी घ्यावे लागते. प्रतिमाणसी दरडोई १३५ लिटर या निर्धारित मानकाप्रमाणे पाणी दिले जाते. ज्यांना जास्त पाणी लागते, ते खासगी टँकरच्या माध्यमातून पाणी घेत आहेत.

**दिवसाला ६१५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा**

महापालिका दिवसाला पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) १५ असे ६१५ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उचलते. तरीही संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराला दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत आहे. सध्याची पाण्याची स्थिती पाहता २०२५ पर्यंत दिवसाआडच पाणीपुरवठा करावा लागणार आहे. भामा-आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठीच्या जलवाहिनीचे काम सन २०२५ पर्यंत पूर्ण होईल. तोपर्यंत पाणी पुरवठा एक दिवसाआडच सुरू राहणार असल्याचे पाणीपुरवठा प्रशासनाने स्पष्ट केले आहे

पवना धरणात २८ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. जून महिन्यात पावसाला विलंब झाल्यास पाणी टंचाईला सामोरे जावे लागू शकते. शहरी भागात पाण्याचा काटकसरीने वापर करावा.

-रजनीश बारिया, शाखा अभियंता, पवना धरण

पवना व आंद्रा धरणातून पाणीपुरवठा सुरू असल्याने अजूनही पाणीपुरवठा दिवसाआड पण सुरळीत सुरू आहे. धरणातील पाणी कमी झाल्यास निश्चितपणे आणखी पाणी कपात करावी लागेल. विस्कळीत पाणीपुरवठ्याबाबत काही तक्रारी नाहीत. जूनमध्ये तक्रारी वाढू शकतील. पाणीपुरवठा विस्कळीत झाला तरच टँकरद्वारे पाणी दिले जाते. जास्तीचे पाणी लागते म्हणून खासगी गृहनिर्माण संस्था टँकरद्वारे पाणी घेतात.

- श्रीकांत सवणे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.